पुस्तकामागची भूमिका

एचआयव्हीसह आरोग्यपूर्ण आयुष्य आपल्याला आता शक्य आहे. एआरटी औषधांनी हा विश्वास आपल्याला दिलेला आहे. ऐंशी-नव्वदच्या दशकात एचआयव्हीसह जन्माला आलेले मित्रमैत्रिणी आता जोडीदारनिवड, सहजीवन इतकंच काय पण पालक होण्यापर्यंत पोचले आहेत. एचआयव्हीमुळे अल्पवयात मृत्यू होण्याची शक्यता आता जवळजवळ संपली आहे. साहजिकच चांगल्या पद्धतीनं समृद्ध जीवन जगता येईल असा आत्मविश्वास या मित्रमैत्रिणींच्या चेहऱ्यावर आता दिसू लागला आहे .

काही एक काळजी घेता आली तर एचआयव्हीसह लग्न करणं, एचआयव्ही नसलेल्या बाळाला जन्माला घालणं हे अगदी निर्धोकपणे सहज शक्य आहे. त्या निमित्तानं जीवनाचा जोडीदार निवडणं, सहजीवन निभावणं आणि पालक होणं ह्या जीवनातल्या महत्वाच्या टप्प्यांकडेही तरुण मित्रमैत्रिणींचं लक्ष जावं म्हणून हे पुस्तक ....

ह्या पुस्तकाची प्रेरणा हे एचआयव्हीसह समर्थपणे आयुष्य जगणारे तरुणतरुणी आहेत. त्यांचे प्रश्न त्यांच्याशी झालेल्या चर्चा ह्यातूनच हे पुस्तक तयार झालेलं आहे. आजच्या काळात लग्न करू इच्छिणाऱ्या मुला-मुलींसाठी अनेक पुस्तकं लिहिली जातात. चर्चासत्रे आयोजित केली जातात. एचआयव्हीसह लग्नाचा निर्णय घेण्याबद्दल मात्र सामान्यपणे मुलामुलींच्या आणि त्यांच्या पालकांच्या मनात धाकधूक असते. त्याचं महत्वाचं कारण एचआयव्हीबद्दल असलेल्या गैरसमजुती आणि नव्या शोधांबद्दलचं अज्ञान. आपल्या भाषेत तर ही माहिती सहज कुठेही मिळत नाही. म्हणूनच हे पुस्तक लिहिण्याचं ठरवलं आहे.

नव्वदीच्या दशकात एआरटी औषधे फारशी उपलब्ध नव्हती आणि आयुष्य थोडे वाढवणारी काही औषधे मिळत पण ती फार महाग असत. 2000 सालाच्या सुमाराला औषधांच्या किंमती झपाट्याने खाली आल्या. 2006 पासून तर एआरटी औषधे सरकारी व्यवस्थेत मोफत मिळू लागली. त्याचा फार मोठा फायदा ह्या आज आज किशोरवयात आणि नवतारुण्यात पोचणाऱ्या पिढीला मिळाला. जन्मापासून किंवा अगदी बालपणापासून एचआयव्ही असूनही एआरटी औषधांच्या बळावर ही मुलेमुली आज निरोगी जीवन स्वत: जगत तर आहेतच शिवाय जोडीदाराला एचआयव्ही न व्हावा अशी काळजी घेऊ शकतात, इतकंच नाही तर त्यांच्या पोटी येणाऱ्या बाळांना एचआयव्ही शिवाय जन्माला घालणंही आता सहज शक्य आहे. त्यामुळे आता आपण ठरवलं तर यानंतरचं प्रत्येक  बाळ एचआयव्ही नसलेलं असेल.

असं म्हणतात की प्रश्न-अडचणींमधून जाताना आपण ज्या वेगाने विचार करतो, तेवढा एरवी करत नाही. एचआयव्हीसह जीवन जगणारे साहजिकच जीवनाचा विचार अधिक विस्तारानं करताना दिसतात. हे आम्ही केवळ तत्त्व म्हणून सांगत नाही, तसा आमचा अनेक वर्षांचा अनुभवच आहे.

लग्नाच्या वयातील मुलामुलींना लग्न करताना महत्त्वाचे प्रश्न समजावेत आणि त्याबद्दलची केवळ माहितीच नाही तर लग्न ही संकल्पना  समजण्यासाठी-निभावण्यासाठी सकारात्मक संवाद कसा साधावा हेही समजावं म्हणून ह्या पुस्तिकेत तशी वेगवेगळी प्रकरणे दिलेली आहेत. ह्या मांडणीला एचआयव्हीच्या विषयात काम करताना येणाऱ्या अनुभवांची जोड आहे म्हणूनच ते वाचकांना आवडेल अशी खात्री वाटते.

अनुक्रम

*प्रकरण 1 लग्नाचा विचार करताना* ..... 4

प्रकरण 2. एचआयव्हीसह जोडीदार होताना आणि निवडताना... ..... 11

प्रकरण 3. नातं जपताना ..... 24

प्रकरण 5. एचआयव्हीसह पालक होताना ..... 35

प्रकरण 6: एचआयव्हीसह लग्न करताना, पालकांची भूमिका - ..... 43

## *प्रकरण 1 लग्नाचा विचार करताना*

आजच्या काळात एचआयव्ही ह्या आजाराला एआरटी औषधं उपलब्ध होत असल्यानं 'लग्न आणि एचआयव्ही' या विषयाबद्दल पूर्वी वाटत असलेली भीती खूपच कमी झालेली आहे. तरीही एचआयव्ही असलेल्यांच्या मनात लग्नाचा विचार करताना काही प्रश्न उभे राहतात. म्हणूनच एक समुपदेशक आणि मैत्रीण म्हणून त्यांच्या गप्पांमध्ये सामील व्हायचं ठरवलं.

तरुण- तरुणी जमले होते, हसत-खिदळत गप्पा मारत होते. समुपदेशक म्हणून त्यांच्याशी लहानपणापासून ओळख होतीच. यापूर्वी झालेल्या कार्यशाळा, गप्पा यातून या मुलामुलींना एचआयव्हीबद्दल बरीच माहिती होती. तरीही आपल्याला एचआयव्ही आहे आणि लग्न करण्याची इच्छा आहे यात आपलं काही चुकत तर नाही ना, या प्रश्नानं गेले काही दिवस त्यांना सतावलेलं आहे. त्यांच्या गप्पांमध्ये सामील होण्याचा उद्देशच त्यांच्या प्रश्नांना उत्तरं देण्याचा आणि मनात कुठलीही धास्ती बाळगायचं कारण नाही असा आत्मविश्वास त्यांच्या मनात वाढवण्याचा आहे.

- 000000000000 -

**प्रियांका :** अगं (समुपदेशक) ताई, आम्ही सगळे आमची लग्नं आणि आम्हाला असलेला एचआयव्ही, ह्यावर गेले काही दिवस सतत बोलतो आहोत. इतकी वर्षं शाळा-कॉलेज, अभ्यास, मित्रमैत्रिणी, गप्पा ह्यातच गेली. तसे लहानही होतो, पण आता घराघरात प्रत्यक्ष लग्नाची वेळ आलीय. तेंव्हा मात्र बुचकळ्यात पडल्यासारखं वाटतंय.

**संदेश :** लग्नाची वेळ आलीय? काहीही काय बोलतेस?

**प्रियांका** : ए गप रे, अरे, लग्नाची वेळ आली म्हणजे, आपल्या प्रत्येकाच्या घरी लग्नाचा विचार येता जाता बोलून दाखवला जातोय. आणि घरच्यांचं सोड, पण आपल्याही मनात येतातच की नाही लग्नाचे विचार.

**संदेश** : ह्या मुलींचं बरं असतं. ह्यांनी लग्न करायचं ठरवलं की मुलं स्वतःहून त्यांना प्रपोज करतात. पण आम्हाला तर मुलीशी मैत्री करण्याआधीच तिला आमच्या एचआयव्हीविषयी सांगण्याचं टेन्शन येतं!

**निगार** : ए चल चल, काहीतरीच काय? सांगून आलेल्या मुलाला एचआयव्हीबद्दल सांगायचं टेन्शन आम्हालाही असतंच. आणि तुला सांगू का, घरातली माणसं 'एचआयव्हीबाबत नवऱ्याला लग्नाआधी सांगूच नकोस' असा दबाव आम्हा मुलींवर टाकत असतात.

**ताई** : म्हणजे तुमचा प्रश्न लग्न करण्याबद्दलचा नाहीय, तर आपल्या होणाऱ्या जोडीदाराला कसं सांगायचं हा आहे. हो ना? ह्याचं उत्तर सरळ आहे. आपल्याला एचआयव्ही आहे हे आपल्या होणाऱ्या जोडीदाराला, जोडीदार होण्याचा निर्णय घेण्यापूर्वी सांगायलाच हवं. काय रे महेश, हे तर आपल्याला आधीपासून मान्यच आहे ना?

**महेश** : तिथेच प्रश्न येतो ना ग, सांगायला हवं हे मान्य आहे पण ते कसं सांगायचं? आतून एक भीती वाटत राहाते ग.

निगार: कशाची भीती महेश? आपण हे सांगितल्यावर आपल्याला नकार मिळेल ह्याचीच ना? ह्या भीतीवर आपल्याला मात करायलाच हवी अरे, एचआयव्ही असताना ते न सांगता आपण त्या जोडीदाराशी लग्न करणार ह्या विचाराचं सुद्धा आपल्या मनाला इतकं ओझं वाटेल; त्यापेक्षा कदाचित आत्ता नकार मिळाला तरी तो स्वीकारणं सोपं जाईल. आणि आपल्या आयुष्याचा विचार केला तरी, मला वाटतं, आपल्या शरीरात एचआयव्ही नावाचा विषाणू आहे, तो आतापर्यंतच्या संशोधनांनुसार कायमचा नाहीसा होणार नाही, म्हणून त्याचं भान आपल्याला आयुष्यभर ठेवावं लागणार आहे. दक्षता घ्यावी लागणार आहे. औषधं, वेळोवेळच्या तपासण्या, लैंगिक संबंधात निरोधचा वापर, असं सगळं करावं लागणार आहे. एक विचार कर, आपला जोडीदार स्वत:च जर एचआयव्ही असलेला असेल तर त्याला सांगण्यात काहीच भीती नाही. समजा त्याला एचआयव्ही  नसेल तरच त्याला सांगण्यातल्या धास्तीचा मुद्दा येणार. पण तरीही आपल्या प्रेमाच्या, जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपल्यासमवेत असणाऱ्या जोडीदारालाही आपल्याला घ्याव्या लागणाऱ्या दक्षतांबद्दल माहीत असायलाच हवं ना!

सरिता  : पण म्हणजे आपण एचआयव्ही असलेल्याच व्यक्तीशी लग्न करावं असं म्हणायचंय का?

महेश : असं कोण म्हणतंय? पण त्याला सांगायला आपल्याला काहीच भीती वाटणार नाही, हे खरंच आहे ना?

**सरिता**: ते तर आहेच महेश, पण मला खरंच वाटतं की एचआयव्ही असलेल्यांनी एचआयव्ही असलेल्यांशीच लग्न करावं बाबा. नाहीतर आपल्याकडून त्याला एचआयव्ही होईल अशी धास्ती  सारखी मनात राहील असं वाटतं मला. माझ्या भीतीचं खरं कारण हे आहे....

**ताई** : असं काय करतेस सरिता, आपल्याला एचआयव्ही आहे तेव्हा आपण आपली औषधं वेळेवर घेणार, औषधं वेळेवर घेत राहिल्यामुळे आपल्या रक्तातला विषाणू शून्यावर राहील अशी काळजीही घेणार हो ना? आत्ताही घेता आहात ना तुम्ही तशी काळजी? औषधं घेताय, वर्षानं व्हायरल लोड करून तो शून्यावर राहातोय ना हे पाहताय, तर मग एचआयव्ही नसलेल्या आपल्या जोडीदाराला आपल्यामुळे एचआयव्ही

होण्याचा धोका नाहीच आहे. तरीही आपल्या मनात थोडीही चिंता राहू नये म्हणून प्रत्येक लैंगिक संबंधात कंडोम वापरायचा हेही आपण ठरवलेलंच आहे; आहे ना? मग आता कसली भीती?

**सरिता:** ते सगळं मला माहीत आहे गं, पण माझा प्रश्न आहे तो **आपल्या होणाऱ्या जोडीदाराला आपल्या एचआयव्हीबाबत कसं सांगावं हा.** नुसता विचार जरी मनात आला तरी धडधडतं, नकारच मिळणार असं वाटत राहतं. वाटतं, आम्हाला नाही का सरळ इतरांसारखा लग्न करण्याचा हक्क? काय एवढा गुन्हा केलाय आम्ही?

महेश : डोक्यावर पडलीएस का ग तू? एकदा म्हणतीयस लागणीची भीती, एकदा म्हणतीएस नकाराची भीती. प्रॉब्लेम काय आहे तुझा?

ताई **:** ए सरिता, तुला तर सगळं माहीत आहेच की. एचआयव्ही हा काही गुन्हा नाही. आई-वडिलांकडून आलेला एचआयव्ही यात आपण गुन्हा करण्याचा काही प्रश्नच नाही.

**निगार** : ताई, म्हणजे ज्यांना आईवडलांकडून झालेला नाही त्यांचं काय? ते गुन्हेगार का?

ताई : एचआयव्ही हा विषाणू आहे, तो गुन्हा नाही. तेव्हा कुणाही व्यक्तीला एचआयव्ही असण्याबद्दल दोषी ठरवायचं मुळातच कारण नाही. पण लग्न करताना आपण ही महत्त्वाची माहिती आपल्या जोडीदाराला सांगितलीच नाही तर ते मात्र कायद्याच्या दृष्टीनं गैर आहे.

**सरिता**: बरं, मान्य, पण अजूनही मला एक गोष्ट कळतच नाहीये, की सांगायचं पण ते कसं ? ते सांग आधी.

**ताई** : सरळ आणि स्पष्टपणे.

**महेश** : म्हणजे?

**ताई** : मी काही तुमचे शब्द, तुमची एकमेकांशी बोलायची भाषा सांगू शकत नाही, पण हे सांगताना कोणते मुद्दे आपल्या बोलण्यात यायलाच हवेत ते सांगते. पहिला मुद्दा म्हणजे **मला एचआयव्ही या विषाणूची लागण आहे. हा आजार पूर्वी गंभीर मानला जात असे. आता मात्र तो तसा उरलेला नाही. दुसरा मुद्दा - त्यासाठी एआरटी-औषधे असतात ती मी घेत आहे. या औषधांमुळे** एचआयव्ही **संपूर्ण नियंत्रणात ठेवता येतो. माझ्या रक्तात आता** एचआयव्हीचं **प्रमाण जवळजवळ शून्य आहे. हे तपासण्यासाठी मी वर्षाकाठी निदान एकदा रक्ताची खास तपासणी करत असतो/ असते.**

**हे असं सगळं सरळसरळ सांगायला हवं. आणखी काय सांगशील तू महेश?**

**महेश : आज माझ्या रक्तात एचआयव्हीचं प्रमाण नसल्याइतकं कमी आहे. त्यामुळे माझ्यापासून तुला एचआयव्हीचा धोका नाही आणि उद्या आपल्या बाळालाही एचआयव्ही होणार नाही, अशी पूर्ण काळजी आपल्याला घेता येईल.**

**लैंगिकसंबंधात निरोधचा वापर मात्र प्रत्येकवेळी करावा असा पक्क्या खात्रीसाठी डॉक्टरांचा सल्ला आहे.**

**विषय संपला.**

**सरिता : विषय मुळीच संपत नाही, समजा माझा असा** एचआयव्ही **नसलेला जोडीदार असला तर त्याला पुढे प्रश्न असतीलच की प्रत्येकवेळी निरोध वापरल्यावर मग मूल कसं होणार, आणि एखादेवेळी निरोध फाटला तर धोका नाही का?**

**निगार : जरा थांब की सरिता, देऊ आपण ह्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं. तुलाही माहीत आहेतच ती.**

**संदेश**: आणि समजा एवढं सगळं सांगितल्यावरही तिनं नाही म्हटलं तर?

**ताई** : होकार-नकाराचा अधिकार प्रत्येकालाच असतो. त्या अधिकाराचा मान तर आपल्याला ठेवायलाच पाहिजे. पण का नकार दिलाय हे तर विचारावं. कदाचित तिला आणखी काही प्रश्न असतील तर त्यांची उत्तरं आपण देऊ ना. त्यासाठीच तर आपण आपल्या संवादांचं पुस्तक लिहितोय.

होकार- नकार देण्याचा हक्क त्याच्या हातात देण्यापूर्वी एक गोष्ट त्या व्यक्तीला सांगायची की ही माझी अत्यंत खाजगी बाब मी तुला सांगितलीय, तेव्हा तुझा आपल्या नात्यासाठी होकार किंवा नकार असला तरीही तू ही गोष्ट इतर कोणाला सांगू नयेस, अशी मात्र माझी तुला विनंती आणि आग्रह आहे,

**प्रियांका** : पण ताई, इतकं सांगितल्यावरही समजा त्यानं इतरांना सांगितलं तर?

**ताई** : तो धोका आपल्याला घ्यावा लागेल. आणि, मी एक सांगू का, एरवी आपल्याला पसंत केलेल्या किंवा आपल्यावर प्रेम असलेल्या व्यक्तीलाच आपण हे सांगणार असतो, त्यामुळे मग कदाचित त्या व्यक्तीची हिम्मत कमी पडून ती आपल्याला एकवेळ नकारही देईल, पण आपली एचआयव्हीची लागण इतर कुणाला न सांगण्याची विनंती मात्र तो किंवा ती मान्य करेल आणि पाळेलसुद्धा!

त्यातूनही ही व्यक्ती जर अगदीच हलक्या कानाची निघाली, तर असल्या व्यक्तीशी आपलं लग्न होऊन संपूर्ण आयुष्य वाया गेलं नाही ही चांगलीच गोष्ट झाली, असं आपण म्हणायचं. कारण ज्या व्यक्तीशी आपण लग्न करायला, आपलं आयुष्य जोडायला निघालोय ती व्यक्ती निवडण्यात आपली चूक व्हायला नको!

एक गोष्ट मात्र आणखी सांगते, एचआयव्हीबद्दल सांगताना कोणतीही खोटी आणि तात्पुरतं सावरून घेणारी माहिती आपणही कधी सांगायची नाही !

**सरिता**: खोटी म्हणजे कसली?

**निगार** : माझ्या आलं लक्षात ताई तू काय म्हणतेयस ते. सरिता, खोटी माहिती म्हणजे, लागणीची आत्ता सुरुवातच आहे, पूर्ण बरं करणारं औषध आलेलंच आहे, मला खूप एचआयव्ही झालेलाच नाही, थोडाच झालाय वगैरे... बरोबर आहे ना ताई? असं सांगतात काही मुलं-मुली. मी पाहिलंय.

**प्रियांका** : पण ताई असा थोडासाच एचआयव्ही कोणाला होत असतो का गं ?

**ताई :** नाही ना गं, एचआयव्हीची लागण होते म्हणजे आपल्या शरीरात एचआयव्हीचा विषाणू शिरतो. ह्यात कमी जास्त असं काही नाही. एकतर आपल्याला लागण असते किंवा नसते.

**निगार** : हे सगळं ठीक आहे, मला समजलंय ते आता. पण 'कशी झाली ही एचआयव्हीची लागण तुला?' असं विचारलं त्यानं तर?

**ताई** : फार महत्त्वाचा प्रश्न विचारलास निगार. आपल्याला लागण आहे हे आपल्याला कसं समजलं, कधी समजलं, हे सांगायला हवं. आपली लागण पालकांकडून झालेली असेल तर, ते सांगावं की नाही हा तुमचा खाजगी प्रश्न आहे. याचं कारण असं आहे की त्यातून आपोआप तुमच्या पालकांना एचआयव्ही असल्याचंही सांगितलं जाणार. तसं सांगण्यात चूक काहीच नाही. मात्र पालकांच्या एचआयव्हीबद्दल न सांगण्याच्या भरात काहीतरी बनवाबनवीचे उत्तर देऊ नका.

**प्रियांका** : पण ताई आता माझंच बघ, माझ्या आईला आणि पपांना दोघांनाही एचआयव्ही नाही पण मला आहे. मग माझ्या बाबतीत तर बरेच प्रश्न पडतील ना माझ्या जोडीदाराला? मग मी काय उत्तरं देऊ ?

**ताई**: आईवडलांकडून जरी नसेल ना तरी लहानपणापासून एचआयव्हीची लागण असेल तर आपल्याकडे कुठल्या शक्यता उरतात? रक्त भरण्यातून, इंजेक्शनच्या सुई-पिचकारीतून किंवा लहानपणी एखाद्या बाळावर लैंगिक अत्याचार झाले असतील तर त्यातून. आता तुझ्याच बाबतीत म्हणायचं तर लहानपणी तू खूप आजारी असायचीस असं तुझी आई मला सांगत होती, तेव्हा कदाचित आवश्यक काळजी न घेता दिलेल्या इंजेक्शनमधून...

**महेश** : ताई, आमची गोष्ट एकवेळ सोडा, पण आजकाल आपण ऐकतो, तसं कुणाला खरंच लैंगिक मार्गातून म्हणजे एचआयव्ही असलेल्या व्यक्तीशी लैंगिक संबंध झाल्यानं झालेला असेल तर?

**ताई** : तरीही माझं उत्तर तेच आहे, महेश. स्वतःच्या लागणीबाबत आपल्याला जी काही माहिती असेल ती शक्यतो खरेपणानं होणाऱ्या जोडीदाराला सांगावी. खरं म्हणजे आपल्याला एचआयव्ही होताना कळतच नसल्यानं नेमकी कशातून ती लागण झाली हे पक्कं माहीत नसतंच. मात्र समोरच्या व्यक्तीचा होकार-नकाराच्या अधिकाराचा आदरही ठेवावा. मुद्दा असा आहे की **कशातूनही एचआयव्ही झालेला असला तरी त्याला उपचाराच्या दृष्टीनं काहीच महत्व नाही. उपचार एचआयव्हीच्या लागणीच्या कारणांवर अवलंबून** नसतात.

**महेश**: मी एक प्रश्न विचारतो. लग्नाआधीच्या संबंधांबद्दल पण बायकोला किंवा नवऱ्याला सांगायला हवं का?

**ताई** : ह्या प्रश्नाचं ठामठोक उत्तर मला देता येणार नाही. मी माझं मत सांगते. प्रत्यक्ष शरीरसंबंध आले असोत किंवा नसोत, मुळात त्या नात्याचा तुमच्या मनावर मोठा परिणाम होणार असेल, सांगून आपल्याला मोकळं वाटणार असेल तर सांगण्याचा विचार जरूर करावा. त्यातही जोडीदाराची कोणती कोणती नाती होती, ती सगळी मला माहीतच असायला हवीत किंवा तुम्ही स्वतः ह्याबाबत सगळं सांगावं अशी जबरदस्ती नसावी.

अजून एक महत्त्वाचं, काही कारणांनी आधीच्या जोडीदाराशी आपला विवाह झाला नाही आणि लग्नानंतर पुन्हा ते आधीचे प्रेमसंबंध सुरू झाले तर लग्न निभावताना तो अडचणीचा मुद्दा होऊ शकतो. म्हणूनच फक्त जोडीदाराला सांगण्याच्या दृष्टीने नाही तर स्वतःच्या मोकळिकीसाठी देखील आधीच्या प्रेमसंबंधातून पूर्ण बाहेर आल्यावरच नव्या नात्याची सुरुवात केलेली बरी.

सगळं मिळून प्रश्न विश्वासाचा आणि पूर्वायुष्यातल्या नात्यांकडे मोकळ्या दृष्टीनं पाहण्याचा आहे.

महेश : सर्वांच्या माहितीसाठी मी ताईच्या म्हणण्यात एक भर घालतो की हे नातं समलैंगिकही असू शकतं.

निगार : हो हो, आपल्याला असं उदाहरणही माहीत आहे. घरच्यांच्या आग्रहासाठी त्यानं लग्न केलं तरी त्याचं खरं नातं त्याच्या मित्राशी आधीपासूनच होतं. पण आईवडलांना दुखवायचं नाही म्हणून त्यानं लग्न केलं....

**प्रियांका**: समलैंगिक असो की नसो आपल्या नातेसंबंधांचा, ते सुरू असतील किंवा थांबलेले असतील, आपल्या मनावर त्यांचा परिणाम असतोच की! आठवण असते, कधीकधी टोचणी असते. त्याचा आपल्याला कधी कधी त्रास होतो, तर कधी नुसती आठवण आली तरी त्यात हरवायला होतं...

**निगार** : त्या आधीच्या नात्यातून आपल्याला एचआयव्ही झाला नसला तरी त्याच्याबद्दल सांगायला हवं का?

**प्रियांका** : अरे, पण ही गोष्ट एचआयव्हीशी मुळातून जोडलेलीच नाही. हां पण आपल्या होणाऱ्या जोडीदारानंही त्याच्या आयुष्यात, पुढील आयुष्यावर परिणाम करू शकेल असं काही घडलेलं असलं तर ते आपल्याला सांगायलाच हवं.

**ताई** : हो. ह्याचा एचआयव्हीशी काही संबंध नाही. एकमेकांसह कुठल्याही ताणतणावांशिवाय आनंदानं जगता यावं, त्यात कुठलीही फसवणूक नसावी तेच  चांगलं नातं. एचआयव्हीच्या निमित्तानं हा विषय आपल्यासमोर आलाय इतकंच.

**निगार** : भारी. मला आवडलं तुझं म्हणणं ताई. मित्रांनो, यावरून मला असं सुचतंय की आपला जोडीदार कसा असावा त्याची निवड तरी आपण कशी करावी ह्या मुद्द्यावरही आपण ताईशी बोलायला हवं. कारण तो जास्त महत्त्वाचा मुद्दा आहे. आपण मात्र सगळं बाजूला सोडून, या एचआयव्हीमध्येच गुंतून पडलोयत.

**महेश** : येस्स. नक्की! हो ना ताई?

## प्रकरण 2. एचआयव्हीसह जोडीदार होताना आणि निवडताना...

गेल्यावेळी तरुण मित्रमैत्रिणींशी गप्पा मारल्यानंतर त्यांच्या मनातील अस्वस्थता समजली, चर्चेशेवटी निगार म्हणाली तसं इथले प्रश्न फक्त एचआयव्हीशी जोडलेले नाहीत. मुळात जोडीदार कसा असावा, त्याची निवड कशी करावी ह्याविषयीदेखील विचार करण्याची गरज आहे. खरं तर प्रत्येकच लग्न करायची इच्छा असलेला माणूस 'आपल्याला जोडीदार कसा हवा' याचा काही ना काहीतरी विचार करतच असतो. ह्यावेळी त्यावरच बोलायचं ठरवून सगळे जमले होते.

सरिता जरा घुश्यातच दिसत होती तरी बाकीच्यांशी बोलताना हळूहळू तिची कळी खुलत गेली.

**प्रियांका** : काय गं सरिता, काय झालंय तुझ्या मूडला आज?

**सरिता** : काही नाही गं नेहमीचंच, मामा काल परत नवं स्थळ घेऊन आला होता.... म्हणे आता मी एकोणीस वर्षाची झाले, लग्न लवकर करायला हवं, वय वाढत चाललंय!

**प्रियांका** : हो गं! नेहमीचंच आहे हे, आमच्या घरी तरी काय, तेच आहे. मला तर ही वय वाढत चाललंय वगैरे मतं ऐकली की त्याचा अर्थच कळत नाही. आपलं लग्नाच्या वेळी वय काय असायला हवं म्हणजे या लोकांना समाधान वाटेल?

**निगार** : लग्न करावंसं वाटेल तेव्हा करावं नं, त्यात कसलं आलंय वय? पण ह्या लोकांना मुळी कळतच नाही. त्यातही पुन्हा आपण मुली. त्यामुळे तर...फारच करतात अगदी. ताई, तू गप्प का बसल्येयस? तुला काय वाटतं ते सांग ना.

**ताई** : हो ग, तुम्ही म्हणता ते खरंच आहे. लग्न करणं ही दात येण्यासारखी नैसर्गिक वाढीची बाब वाटते कधीकधी लोकांना! म्हणजे आता बाळ सहा महिन्याचं झालं, आता त्याला दात येणार... तसं आता मुलगी अठरा वर्षांची झाली, आता तिचं लग्न होणार... एक गोष्ट खरी आहे की साधारणपणे लोक तरुणवयात लग्न करतात. अर्थात तोही काही नियम नाही. पण शरीरसंबंध तरुणवयात जास्त होतात त्यामुळे...

**सरिता** : पण लग्न काय फक्त शरीरसंबंधांसाठी असतं का?

**ताई** : नक्कीच नाही. पण तुम्हाला एक गंमत सांगू, पूर्वी लग्नाला शरीरसंबंध असंही म्हणत, आणि लग्नपत्रिकेवर ह्यांचा आणि त्यांचा शरीरसंबंध निश्चित केलेला आहे, तरी सर्वांनी यावे असं आमंत्रण देत असत! आज आपण म्हणतो, पतीपत्नींची मनं जुळायला हवीत, एकमेकांसह जगण्याची त्यांना ओढ असावी, मनाला भावेल असा जोडीदार असावा... तसं त्या काळी मानलं जात नव्हतं.

बरं, ते सगळं खूप मागे पडलं , ए सरिता, सांग ग तुला कसा मुलगा हवा आहे?

**सरिता** : असं काय हो ताई , तुम्ही तर घरच्यांसारखंच बोलायला लागलात.

**ताई** : नाही ग, तुला लग्नच करायचं नसलं तर तसं सांग, पण करणार असशील तर तो कसा हवा? म्हणजे मी एकट्या सरितालाच विचारतेय असं नाही, सगळ्यांनीच सांगा. मुलींनी आणि मुलग्यांनीही सांगा.

**सरिता** : मला ना मुलगा माझ्यापेक्षा एक इंच तरी उंच हवा, मी गोरी आहे तर तोदेखील गोरा हवा. माझी काळजी घेणारा म्हणजे मला हवं-नको ते सर्व बघणारा हवा.

**महेश**: माझं, दिसण्याबाबत काही म्हणणं नाही. पण नेटकी राहणारी असावी, माझ्या घरच्या लोकांना समजावून घेणारी असावी. काही सांगायला लागलं नाही पाहिजे. सगळं तिला आपोआप समजायला हवं!

**संदेश**: माझी बायको दिसायला गोरी तर असायलाच हवी. आमच्या घरात सगळे गोरे आहेत.

**ताई** : आपल्या समाजात, रंगावरून, रूपावरून किती भेदभाव होतो, लाखो रुपयांची फेयरनेस क्रीमची इंडस्ट्री चालते. त्यामुळे पैशांचा तर चुराडा होत असतोच पण शारीरिक हानीही लोक करून घेत असतात, ते कशासाठी तर रंग उजळवण्यासाठी ... चांगलं दिसणं याचा अर्थ गोरं असणं असा नाही आणि प्रत्येकजण दुसऱ्यापेक्षा वेगळा आहे म्हणून त्यात मजा आहे; समजा सगळेच दीपिका पदुकोण किंवा ऐश्वर्या राय किंवा सलमान खान असे दिसले असते तर मजाच आली नसती! आपली मैत्रीण किंवा आपला मित्र असा काही फरकच राहिला नसता तर लग्नाबिग्नाचं सोडाच, जीवन जगण्यातही काही मजा राहिली नसती.

इतरांच सोडा, आपण आपल्या दिसण्याबाबत काय विचार करतो? आपणही तशाच कल्पनांमुळे स्वत:ला सुंदर किंवा कुरुप म्हणत असू तर अडचण आहे! मला स्वत:ला तर गोऱ्या रंगापेक्षा जास्त काळा रंगच आवडतो.

निगार : आणि सुंदर म्हणजे तरी काय ? एकाला सुंदर दिसणारं माणूस दुसऱ्याला सुंदर दिसेलच असं नाही. आपल्या प्रत्येकाच्या सौंदर्याच्या कल्पनाही वेगवेगळ्या असू शकतात. आपण गोऱ्या रंगाला सुंदर म्हणावं तर आफ्रिकेतल्या स्त्रिया आणि पुरुषही इतके सुंदर दिसतात!

महेश :आणि दुसरं, अतिशय सुंदर दिसणारी आपली जवळची व्यक्ती काही दिवसांनी समजा, काही कारणांनी अपघातानं वगैरे आधीप्रमाणे सुंदर दिसेनाशी झाली तर आपण तिला टाकून देणार का?

**सरिता** : असं कसं होईल?

**महेश** : समजा, काही कारणांनी एखाद्याच्या चेहऱ्यावर डाग पडले किंवा हात-पाय काही जायबंदी झाला तर?

ताई :जोडीदारामध्ये कोणत्या गोष्टी आपल्याला महत्त्वाच्या वाटतात आणि कुठे तडजोड चालेल ह्याचा विचार ज्याचा त्याचा म्हणून नक्कीच असणार. पण एखादी मुलगी किंवा मुलगा कदाचित रूढ अर्थानं सुंदर वगैरे नाही, पण त्याच्या व्यक्तिमत्त्वात काही वैशिष्ट्य असेल तर सुंदर दिसण्याच्या आपल्या ठरावीक अपेक्षेमुळे ती व्यक्ती आपल्याला आवडणारच नाही असं व्हायला नको. सांग बरं सरिता, काय फरक पडतो मुलगा तुझ्यापेक्षा उंच नसेल तर ...गोरा नसेल तर ?

**सरिता** : हं, तसा नाही पडणार... फक्त मला चिडवतील सगळे किंवा मागे बोलत राहतील वगैरे .... ते सोड ! म्हणजे खरंच ताई, चांगला समजून घेणारा जोडीदार असेल आणि मी फक्त त्याच्या उंचीकडे

पाहून त्याला नाकारावं.... असं बरोबर नाही आणि फक्त दिसण्याकडे पाहून, स्वभाव समजून न घेताच पुढे जाणंही योग्य नाही ! पण निदान त्याचं शिक्षण तरी माझ्यापेक्षा जास्त पाहिजे.

**ताई** : ही अपेक्षा मुलींची आणि मुलांची दोघांचीही आहे का?

**सर्व मुली** : हो म्हणजे असणारच ना.

**सर्व मुलगे** : आमची नाही गं ताई अशी अपेक्षा, म्हणजे बायको आपल्याहून जास्त शिकलेली असेल तर चालेल आम्हाला. पण तिनं तिच्या शिक्षणाचा माज नाही केला पाहिजे.

**प्रियांका** : आणि समजा नवरा अधिक शिकलेला असला तर त्यानंही माज करू नये, असं नाही का वाटत तुला? नवरा-बायको एका समान पातळीवर असले तर त्यांच्यात बरोबरीचा, समानतेचा संवाद होईल.

**सरिता** : पण कुणाचं शिक्षण जास्त असतं तर कुणाजवळ चांगलं व्यवहारज्ञान असतं, काही कला असतात, मुद्दा आपण दुसऱ्या माणसाला आपल्या बरोबरीचं मानतो की नाही असा आहे.

**ताई** मुलाची उंची- शिक्षण आपल्यापेक्षा जास्त असावं असं जेव्हा कुणी मुलगी म्हणते ना तेव्हा ती कळत-नकळत स्वत:लाच कमी लेखत असते असं मला वाटतं आणि मुलग्यांची अपेक्षा असते की, त्या मुलीनं माझ्या घरच्यांना समजून घ्यावं ; हेदेखील मला मुलींच्या बाजूनी अन्यायकारक वाटतंय. आधीच मुलींना नवऱ्याच्या घरी जावं लागतं, स्वतःच नावदेखील बहुतेकवेळा बदलावं लागतं. त्यात नव्या घराशी जुळवून घेण्याची जबाबदारीही त्यांच्यावरच टाकण्याची अपेक्षा, हे योग्य वाटतं का तुम्हाला ?

**निगार** : नवरा वागेल एकवेळ बरोबरीच्या नात्यानं, पण घरच्यांचं काय? ते कसे वागतात नव्या सुनेशी?

**महेश:** ते कसेही वागले तर आपण आपल्या पार्टनरच्या बाजूनं उभं राहायचं.

**प्रियांका** : मुख्य मुद्दा लग्न ठरवतानाच सुरू होतो.

**सरिता** : हो, त्यांना जातीतलाच जावई किंवा सून हवी असते.

**निगार** : आमच्यात तर बरेच प्रकार आहेत, आणि त्याच्याबाहेर लग्न केलं तर वाळीतच टाकतात.

**ताई** : मला वाटतं, जात, धर्म ही माणसामाणसात फरक करणारी गोष्ट आहे. रक्त तर सगळ्यांचं सारखंच असतं ना? रक्ताची गरज पडते तेव्हा कुणी म्हणतं का की माझ्याच जातीधर्माच्या माणसाचं रक्त मी घेईन नाहीतर एकवेळ मरून जाईन! असं कुणी म्हणतं? नाही ना?

**निगार** : तसं नाही ग, पण घरातल्या स्वैपाकाच्या, वागण्याच्या, सणवाराच्या पद्धती वेगवेगळ्या असतात ना!

**ताई** : हे फरक सावरून घेण्यासारखे असतात. सणवार, स्वैपाक कधी इकडच्यांसारखा तर कधी तिकडच्यांसारखा करायचा. आपण सगळे हल्ली साउथ-इंडियन किंवा पंजाबी जेवण आवडीनं नाही का खात? सर्वात महत्त्वाचं म्हणजे एकमेकांचा स्वीकार आणि जोडीदाराविषयी वाटणारं प्रेम! ते असेल तर ह्या गोष्टी फारशा महत्त्वाच्या ठरत नाहीत.

आईवडिलांचं म्हणशील तर मुळात लग्न ही अतिशय वैयक्तिक गोष्ट आहे, ती कोणावरही मनाविरुध्द लादली जाऊ नये. ज्यांना प्रत्यक्ष लग्न करायचं असतं म्हणजे तुमच्यासारख्या मुलांना, खऱ्या अर्थानं

साथीची - जोडीदाराची, स्वतःच्या हक्काच्या माणसाची गरज असते. यासाठीच आपलं लग्न ही आपली स्वतःची, विचार करून करायची गोष्ट आहे.

आईवडिलांची गोष्ट कधीकधी वेगळीच असते. त्यांच्या मनावर सामाजिक चालीरीतींचा पगडा अधिक असतो. त्याच्या बाहेर जाऊन त्यांनी विचार केलेला नसतो, किंवा मनानं अजून ते जुन्या काळातच वावरत असतात. म्हणूनच आई-वडिलांशी ह्या संदर्भात वागताना आपल्यालाच ठामपणानं वागावं लागतं.. आपलं लग्न ही आपलीच जबाबदारी असते आणि आईवडील आपल्यावर खूप प्रेम करत असले तरी ही जबाबदारी आपली आपणच घ्यावी, त्यांच्यावर सोडू नये.

**सरिता** : करेक्ट आहे. आपल्याला जो मुलगा किंवा मुलगी आवडते, ज्याच्याबरोबर कूल वाटतं, त्याच्याशीच आपण लग्न करायला हवं.

**निगार** : मला तर जाती-धर्माचं बंधन मान्यच नाही. पण आई-वडील आमचं कुठे काय ऐकतात? लगेच इज्जतीचा प्रश्न समोर आणतात आणि अगदीच नाही ऐकलं तर इमोशनल ब्लॅकमेलिंग सुरू करतात. काय करायचं त्यांच्या पुढे?

**ताई** : तरीही आपला हट्ट सोडायचा नाही. आईवडिलांना पटत नसलं तरी आपण ठाम राहायचं, आई-वडिलांचे विचार बदलण्यासाठी नम्रतेने प्रयत्न करत राहायचे.

**निगार** : ताई म्हणतेय तसं वागणं अजिबात सोपं नाही पण आत्ताच ठामपणे निर्णय नाही घेतला तर नंतर आयुष्यभर पश्चात्तापाची पाळी येईल.

**महेश** : प्रिय मित्रमैत्रिणींनो, मी एक प्रश्न विचारू का,

हे **लग्न करायचंय ते मुळात कशासाठी?** आपला जोडीदार आपण निवडला पाहिजे, जोडीदारानंही आपल्याला निवडायला हवं. असं आपण इथं ठरवतोय, म्हणजे आईबापांशी भांडण आलंच. ते पण करू, तसंही इतर शंभर कारणांसाठी आपलं आईबापांशी खटकत असतंच. पुढे ते आपल्या बायकोशी कसे वागतात त्यावर त्यांच्याशी भांडायला लागतं की नाही ते ठरणार. पुन्हा बायकोशी दहा कारणांवरून आपलं भांडण होतच राहणार, तर आधी मला हे सांगा की, लग्नच का करायचं? ते एकदा कळलं की पुढची सगळी उत्तरं सापडतील.

निगार : मग तूच सांग ना, कशासाठी लग्न करायचंय तुला? करायचंय ना?

**महेश** : प्रश्न सुचतो राव, म्हणजे लगेच त्याचं उत्तर भेटतं असं नाही .

**निगार** : का करायचंय तेच कळत नाही, तर मग लग्न करायचंय असं का म्हणतोस?

**महेश** : सांगतोय ना मी... मला काय वाटतं, ताई, की आपण लहान असल्यापासून लग्न- लग्न असं ऐकत असतो, नातेवाईकांच्या लग्नांना जात असतो, तिथं आईस्क्रीम खात असतो, त्यामुळे आपल्या मनाला सवयच झालेली असते, कधी ना कधी आपल्याला लग्न करायचंच आहे, अशी आपली कल्पना झालेली

असते. का करायचं ते कुणालाच माहीत नसतं. आणि निघालेलो असतो आपण लग्न करायला. मला तरी असंच वाटतं.

**प्रियांका** : तू स्वत:बद्दल बोल, आमच्याबद्दल कशाला बोलतोस. आम्हाला माहीत आहे आमचं लग्न का करायचंय ते.

**महेश** : माहीत आहे तर सांग ना.

**प्रियांका** : प्रत्येकानं लग्न करायचंच असतं. अरे, आई-बापांच्या जिवावर किती वर्षं जगणार? मला तर त्या घरात राहण्याचापण कंटाळा आलेला आहे. त्यातून बाहेर पडायचंय मला, उठसूट आई, काका-काकी सगळ्यांकडून ऐकून घ्यायला लागतं. म्हणून मला लग्न करायचंय.

**निगार** : मराठीत एक म्हण आहे. आगीतून उठून फुफाट्यात.. तशी गत व्हायला नको, म्हणजे मिळवली.

**प्रियांका** : मराठीत आणखी एक म्हण आहे, 'शुभ बोल रे नाऱ्या तर म्हणे मांडवाला आग लागली'... मला चांगलं सासर मिळावं असं वाटत नाही का तुला? मी आगीतून उठून फुफाट्यात पडेन असं का म्हणालीस? माणसानं नेहमी चांगल्याची इच्छा करावी.

**निगार** : चांगल्याच्या इच्छेनंच म्हणाले मी तसं! नशिबावर हवाला टाकून केवळ ह्या घरात जीव गुदमरतोय म्हणून मिळेल त्याच्याशी लग्न करशील आणि पस्तावशील. तसं व्हायला नको.

**ताई** : प्रियांका, निगार म्हणते त्यात अर्थ दिसतो ग मला. लग्न करण्याचं कारण हे असं भलतीकडून आलेलं असेल म्हणजे, या घरात राहायला आवडत नाही, आईवडलांशी पटत नाही, घरचे शिकू देत नाहीत किंवा फॅशनचे कपडे घालू देत नाहीत; त्यावर उपाय म्हणून जर लग्न करायचा विचार करत असशील तर त्यात मला तरी प्रॉब्लेम दिसतो. सरिता, तू सांग गं तुला का करायचंय लग्न?

**सरिता** : आयुष्यात आपल्याला एक जोडीदार मिळावा-- आपली सुख-दु:ख वाटून घ्यायला , एक मित्र असावा, तो आपली काळजी घेणारा, प्रेम करणारा...आपल्याला जे हवं ते मिळवून देणारा. आपले लाड करणारा.

**महेश** : पाहिलंस ताई, ती प्रियांका एक टोक तर ही सरिता दुसरं. फार स्वप्नाळू आहेत या पोरी.

**निगार** : सरिताचं म्हणणं दिशा म्हणून मला काही प्रमाणात मान्य आहे, पण एकतर, ती फक्त तिच्या सुखाचा विचार करतेय. दुसऱ्या बाजूचा विचार करत नाहीय. सारखे आपले लाड दुसऱ्यानं करावेत असा विचार करणं मला तरी आवडत नाही. प्रेमात- मैत्रीत आपण एकमेकांना बरं वाटावं, आनंद व्हावा म्हणून काही तरी करत असतो. ते दोघांनीही करायला हवं. म्हणजे मुलींनी नुसते लाड करून घ्यायचे आणि मुलग्यांनी ते पुरवत राहायचे हे बरोबर नाही. आणि आता बदलत्या काळात तर अशा स्वप्नाळू समजुती आपण बदलल्या नाहीत तर पुढे जाऊन आपल्यालाच त्रास होत असतो. आपणही जोडीदाराचे लाड करायचे असतात, सतत दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची आपल्याला गरज का पडावी? आणि प्रत्यक्षात, आपल्यासारख्या पुरुषप्रधान समाजात तर आणखीच वेगळी परिस्थिती आहे, ही इकडे तो हिचे लाड करेल

म्हणून वाट बघत बसेल, आणि तिकडं त्या मुलाची आई, माझ्या मुलाला खायला करून घालायला आणलेली म्हणून हिच्याकडे बघत असेल.

**सरिता**: माझी आजी म्हणत असते, 'खूपच बिघडत चालली आहेस तू, रात्री उशिरापर्यंत फोनवर असतेस, सारखे नवे फॅशनचे कपडे हवे असतात, लग्नच करून टाकते म्हणजे चांगली सरळ होशील! सासू पाठीत उठता लाथ आणि बसता बुक्की घालेल तेव्हा कळेल.'

**संदेश** : हल्ली एवढे सासुरवास करणारे लोक नसतात. म्हणजे मला माहीत नाही, पण मी पाहीलं तेवढ्या घरात तरी सुनेच्या आवडीचा, शिक्षणाचा, तिच्या नोकरीचा विचार करतात की काही लोकं.

**निगार** : अगदी मारणं, जाळणं वगैरे प्रकरणं फारतर थोडी कमी झालीही असतील रे, पण सुनेकडे घरकामाची जबाबदारी घेणारी म्हणून पाहत असतातच की! ती परिस्थिती सुधारायला खूप वेळ लागणार आहे. आणि काही मुलग्यांच्या घरचे लोक तर इतके हरामी असतात ना, आमच्या शेजारचा एक मुलगा डोक्यानं जरा अधू आहे. मेंटली रिटार्डेड आहे, तर त्याची आई म्हणते, ह्याचं लग्न करून देऊ म्हणजे सगळं नीट होईल.

**सरिता** : बापरे, काय तरी हे लोक! लग्न हा काय उपाय आहे का त्याच्या अशा परिस्थितीवर करण्याचा ?

**ताई** : नाहीच आहे. लग्न हा कुठल्याही रोगावरचा, प्रॉब्लेमवरचा उपाय म्हणून करायची गोष्ट अजिबात नाही. बरेचदा लोकांना वाटत राहतं की लग्न करून देऊ म्हणजे सगळं सुरळीत होईल ... म्हणजे कुणी एक व्यक्ती व्यसनाधीन आहे, मानसिकदृष्ट्या आजारी आहे अशा वेळी पालकांना वाटत राहातं की लग्न केलं की परिस्थिती सुधारेल म्हणून! पण त्यामध्ये फक्त एक नाही तर दोन जणांचं आयुष्य भरडलं जाण्याची शक्यता असते. ***लग्न हे कोणत्याही शारीरिक, मानसिक आजारावर किंवा परिस्थितीवर करायचा उपाय नाही.***

**महेश** : उपाय नाही पण फायदा म्हणूनही लोक लग्नं करतात. ताई, माझ्या मामेभावानं खूप इस्टेट असलेल्या मुलीशी आठ दिवसात लग्न ठरवून, करून पण टाकलं, तो आता काहीच काम करत नाही, निवांत बसून असतो सासऱ्यानं टाकलेल्या एअरकंडेशंड पान शॉपमध्ये.

**संदेश** : बरं असतं बाबा लोकांचं, आँखोही आँखोमे इशारा भी नही हुआ आणि बैठे बैठे जीने का सहारा हो गया ...

**महेश**: पण मी तर असं काही करायचा विचारच करू शकत नाही रे, एखाद्या मुलीची माहितीच नसताना तिचा स्वभाव न समजता डायरेक्ट लग्न? नको रे बाबा.

**ताई** : महेश, तुम्ही फार चांगली मुलं आहात रे, ह्या लग्न करायच्या असल्या कारणामध्ये तुम्हाला काहीतरी खटकतं हीच  खूप चांगली गोष्ट आहे.

**निगार** : पण ताई , एक अशी गोष्ट आहे, ज्याच्यासाठी लोक लग्न करतात... हमखास सोयीचं शरीरसुख मिळण्यासाठी!

**संदेश** : पण लग्न म्हटलं की त्यातून शरीरसुख मिळणंही महत्त्वाचं असतंच की!

निगार : हो, पण लग्न म्हणजे शरीरसुखासाठी केलेली सोय नसावी असं वाटतं मला. निदान मला तरी ते चालणार नाही. विचार केला तरी मला कसंतरीच वाटतं.

संदेश : आपण जरा डिटेलमध्ये बोलूयात ह्यावर. लग्न म्हणजे फक्त शरीरसुख नाही हे जसं खरं आहे, तसंच हक्काचं आनंदाचं आणि विश्वासाचं शरीरसुखासहीत असलेलं नातंही आहेच! मुळात शरीरसंबंध हे वेगळे काढून पाहता येत नाहीत, त्यात रोजच्या आयुष्यातला एकमेकांचा सहवास, त्यातला आनंद, प्रेम व्यक्त करणं, प्रेमाचा, आपुलकीचा आनंद उपभोगणं हे सगळंच येतं. शरीरसंबंध हा लग्नाच्या किंवा प्रेमाच्या नात्यात म्हणा, प्रेम व्यक्त करण्याचा एक उत्कट नैसर्गिक मार्ग आहे.

**सरिता**: अरे, कसलं प्रेम आणि काय? आमच्याकडे एकेकदा लग्न करण्याचं कारण मुलगी प्रेग्नंट राहिलीय हेच असू शकतं. म्हणजे लग्नातून शरीरसुख नाही तर शरीरसुखातून लग्न!

**प्रियांका** : अग, पण त्यानं तिच्याशी लग्न तरी केलं, जबाबदारी झटकली तरी नाही.

सरिता : अग नाही, लेकीला दिवस राहिले आणि पोरगं जातीतलं नाही तर जबरदस्तीनं जातीतल्या दुसऱ्या पोराशी तिचं लग्न लावून देतात.

**संदेश :** पण मला कळत नाही, हल्लीच्या काळात जिथे केवढीतरी गर्भनिरोधक साधनं उपलब्ध आहेत अशा वेळी गर्भ राहिला म्हणून लग्न करण्याची वेळ का यावी, कुणावर? म्हणजे जेव्हा तुम्ही लैंगिक संबंध करता तेव्हा त्याच्या परिणामांची जाणीव तुम्हाला असायला हवी, तशी शंका आली तरी आयपिल्स असतात, समजा राहिले दिवस तरी एम्टी पिल्स असतात.

**ताई** : मला अगदीच पटतंय तुमच म्हणणं, जेव्हा कुणी लग्नाचा विचार करत आहे किंवा लग्न राहू द्या पण लैंगिक संबंधाची शक्यता असलेलं नातं जिथे आहे तिथे उपलब्ध गर्भनिरोधक साधनांची माहिती[1] असायलाच हवी. म्हणजे गर्भनिरोधक गोळ्या आहेत, त्या घेत नसलात आणि असुरक्षित संबंध झालेच तर आय पिल्स आहेत, दिवस राहिलेच तर एम्टी पिल्स किंवा एक मूल झालं असेल तर पुन्हा दिवस राहू नयेत म्हणून तांबी बसवणं ह्या सगळ्या साधनांची आणि त्यांच्या वापराची माहिती हवीच हवी.

**प्रियांका** : आणि कंडोम, तर आपण कधीच विसरू शकत नाही.

**निगार** : करेक्ट, प्रियांका, पण लक्षात ठेव, कंडोममुळे गर्भारपण तर टळतंच पण एचआयव्ही आणि इतर लैंगिक आजारांपासूनही बचाव होतो. मात्र हे साधन हे पुरुष जोडीदारासाठी आहे. ताई, मी ऐकलंय की, स्त्रियांसाठी पण कंडोम मिळतो ना आता?

**ताई** : हो असतो ना, तो पुरुषांसाठीच्या कंडोमपेक्षा थोडा महाग आहे. नुकताच सगळीकडे मिळायला लागला आहे.

अजून एक...जशी ह्या सगळ्या साधनांची माहिती असायला हवीच आहे तशीच लैंगिक संबंधांचीही माहितीही हवी आणि परिणामदेखील माहीत हवेतच.

[1] गर्भनिरोधक साधनांची माहिती, पान क्र ...... वर पहावी

**सरिता**: म्हणजे काय आणखी?

**ताई** : लैंगिक संबंध ही फक्त शारीरिक गोष्ट नाही, त्यामधली मानसिक गुंतवणूक जास्त महत्त्वाची आहे. तुमच्यातल्या काहींना माझ्या म्हणण्याचा अर्थ आत्ता समजणार नाही, पण एकच सांगते, दोघाही व्यक्तींनी एकमेकांचा सन्मान करत, एकमेकांच्या मनाला जपून,एकमेकांना आवडेल- रुचेल अशा पद्धतीने वागत, लैंगिक संबंधांचं नातं धाग्याधाग्यांनी एखादं वस्त्र विणतात तसं विणायला हवं.

**निगार** : ताई, तू काय म्हणालीस ते खरंच, पूर्ण कळलं नाही, पण ऐकायला फार गोड वाटलं.

**संदेश** : ताई, तुमचं म्हणणं खरं की खोटं ते सांगायचा माझा अधिकार नाही. पण आजच्या काळात मोबाईलवर, कंप्युटरवर फिल्म्स बघायला मिळतात, त्यात लैंगिक संबंध केलेले दाखवतात, त्यात तुम्ही म्हणता तशी कुठलीही मानसिक गुंतवणूक नसते. सन्मानाचं नातं नसतं, उलट ...

**ताई** : संदेश, तू सांगतो आहेस ते पोर्नफिल्म्सबद्दल. त्यातल्या दृश्यांचा प्रेमाशी काहीच संबंध नसतो. ह्या फिल्म्स अनेकदा खऱ्याच नसतात, म्हणजे लिंगाचा, स्तनांचा आकार अतिरंजित पद्धतीनं मोठा दाखवलेला असतो किंवा जबरदस्ती केल्याचं दाखवलेलं असू शकतं, लहान मुलांवरचे अत्याचारही असू शकतात. दोन वेगवेगळी चित्रं, चेहरे एकावर एक जोडून किंवा काही आकार मोठे वाढवून आजकाल कंप्युटरच्या मदतीनं तयार केलेल्या फिल्म्सही असू शकतात. ह्यात तासन्तास संभोगक्रिया चालू असल्याचं दाखवलेलं असतं, तशी ती असूच शकत नाही.याचा अर्थ सगळ्या फिल्म्स वाईटच असतात असं नाही. या विषयांवरच्या चांगल्या फिल्म्सही असतात.

**प्रियांका** : ताई, मला एक खरंच कळत नाही, लैंगिक संबंध, नातं हा कुठल्याही मुलामुलीच्या जीवनातला किती महत्त्वाचा भाग आहे आणि त्याबद्दल कधी कुणी आमच्याशी मोकळेपणानं बोलत नाही; आम्हाला सहज बघायला मिळतात त्या पोर्नफिल्म्सच. त्या तू म्हणतेस, मी तरी आजवर पाहिल्या त्या तशाच खोटारड्या आणि घाणेरड्या वाटल्या मला. अरे मग खरं, चांगलं असं काय असतं ते आम्हाला कसं कळणार? कोण सांगणार?

**ताई** : हो ना. तेच तर म्हणतेय, आपल्या शालेय विषयांमध्ये लैंगिक शिक्षणाला पुरेसं स्थान नसल्यामुळे ते आधी कधी समजले असेल याची शक्यता नाही. जी काही माहिती असते ती मित्रमैत्रिणींकडून समजलेली असते... पण लैंगिक संबंध म्हणजे काय, त्यामधली स्त्रीची आणि पुरुषाची समाधानाची भावना म्हणजे काय, गर्भधारणा कशी होते, मूल जन्माला कसं येतं ही सगळी वैज्ञानिक माहिती आपल्याला असायला हवी.[2] ह्याविषयी माहिती सांगणारी चांगली पुस्तकंही आहेत. आणि काही चांगल्या फिल्म्स देखील असतात. त्यांच्याबद्दलची माहितीही तुम्हाला मिळेल असा प्रयत्न मी करेन.

**महेश**: ताई, जोडीदार निवडीचा विचार करताना, एक महत्त्वाचा भाग जोडीदाराच्या एचआयव्हीचाही येईल.

---

[2] लैंगिक संबंधाविषयी वैज्ञानिक माहिती साठी पान क्र..... पहा

**सरिता :** आपण जोडीदाराला सांगण्याबद्दल बोललो होतो तेव्हा जोडीदार पॉझिटिव्ह असेल तर स्वीकार सोपा असेल असं म्हणलो होतो. म्हणजे एचआयव्हीबाबत तरी त्या व्यक्तीला काही समजावत बसावं लागणार नाही

**संदेश** : माझं मत तुम्हाला कदाचित पटणार नाही, पण मला निगेटिव्हच जोडीदार हवा आहे. आधीच आपल्याला खूप त्रास सहन करावा लागला आहे, आयुष्यात. दोघं पॉझिटिव्ह असू तर आपल्यासारखाच त्रास तिलापण झालेला असेल. म्हणून मला निगेटिव्ह जोडीदारच बरा!

**प्रियांका**: हो नं अरे, आपण का बरं पॉझिटिव्ह व्यक्तीला निवडावं ? आपल्याला नॉर्मल जोडीदार का बरं मिळू नये ?

**महेश**: अगं नॉर्मल काय म्हणतेस? म्हणजे आपण काय अबनॉर्मल आहोत का? एचआयव्ही पॉझिटिव्ह किंवा निगेटिव्ह म्हण की!

**ताई** : तुमच्या ह्या अपेक्षा ऐकताना मला असं वाटतंय की, जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीला पॉझिटिव्ह आहे, म्हणून नाकारतोय ह्याचा अर्थ आपणच एचआयव्हीबद्दल मनात भेदभाव मानतोय असा होतोय. आणि हे तर फारच झालं हं, म्हणजे आपण इतर वेळी आपल्याशी कुणीही भेदभावानं वागू नये असं म्हणतो तर मग आपणही त्यानुसार वागायला हवं ना?

संदेश : येस ताई. एकदम मान्य. पट्याच आपनको. आपन तरी आपल्या पॉझिटिव्ह माणसाबरोबर भेदभाव नाय करायला पायजे.

**महेश** : पण ताई, एचआयव्ही असलेली जोडीदार असली तरी तिला फर्स्ट लाईन चालू आहे की सेकंड की थर्ड, ह्यावर तरी आपण निवड ठरवावी का?.

**ताई** : ह्याबद्दलचा विचार आपण डॉक्टरांवर सोडावा. आपण निवड केलेल्या व्यक्तीची प्रकृती कशी आहे याचा अंदाज त्याच्या किंवा तिच्या सीडी4, व्हायरल लोड आणि सुरू असलेली औषधं यावरून डॉक्टर देतील.

**सरिता** : ताई, आम्ही स्वतः गेली अनेक वर्षं एचआयव्हीसह एकदम हेल्दी लाईफ जगत आहोत म्हणजे फक्त एचआयव्ही आहे म्हणून एखाद्या मुलीला किंवा मुलाला नाकारावं किंवा स्वीकारावं हे काही बरोबर नाही हे पटलं मला, पण आपल्यासारखा आई-वडिलांकडून झाला असेल तर काही प्रश्न नाही, पण इतर मार्गातून झाला असेल तर? खरं सांग, चालेल का तुला असा मुलगा, निगार?

निगार: अं..., हे बघ सरिता, मला तुझा प्रश्नाचा रोख समजतो, म्हणजे आपण गेल्यावेळीही ह्यावर बोललो होतोच. म्हणजे आपल्यासारखा पालकांकडून एचआयव्ही झालेला असेल तर मला जोडीदार अधिक समजून घेणारा वाटेल, हे मी प्रांजळपणे कबूल करते, पण अग, इतर मार्गातून झाला असेल तरी त्याच्या तब्येतीत किवा उपचारांवर किंवा आमच्या पुढच्या आयुष्यावर त्याचा काहीच परिणाम होणार नाहीये हेही खरं आहे ना!

ताई : हो, इथे परत मुद्दा खरेपणाचा येतो असं मला वाटतं. काही कारणानं त्याला किंवा तिला एचआयव्ही झालेला असेल तरी आत्ता तो प्रामाणिकपणे सांगून, उलट नव्या नात्याची खरेपणानं सुरुवात करत आहे ना, ते महत्त्वाचं!

**प्रियांका** : काहीवेळा लागण पालकांकडूनही नसते आणि असुरक्षित लैंगिक संबंधांतूनही नसते, अगदी क्वचित होते तशी इंजेक्शनमधून असेल तर मग ह्यावेळी माणसाचा खरेपणा हा त्या माणसावरील आपल्या विश्वासावरच ठरवावा लागेल.

**निगार** : हो ना, म्हणजे एचआयव्ही पालकांकडून नाही, हे काही वाईट चारित्र्याचं सर्टिफिकेट नक्कीच नाही!

**संदेश** : पण जर समजा, तसं असेल तर काय ...

**महेश** : अरे, मगाशी आपण बोललो तेच! जे काही असेल ते खरेपणानं सांगावं , आणि त्या व्यक्तीबाबत आपल्याला खरंच विश्वास- प्रेम वाटत असेल तरच पुढे जावं.

**प्रियांका** : ताई, बरेचदा प्रेमविवाह किंवा ठरवून विवाह करताना, एकाच जोडीदाराला एचआयव्ही असेल आणि लग्न करायचं असेल, समजा जोडीदाराला ते मान्य आहे, हं, समजू की जोडीदाराला सांगितलंय, त्याला ते मान्य आहे, पण त्याच्या पालकांना पटेल का? शक्यच नाही ना. मग काय करायचं?

**ताई** : इथे पालकांना एचआयव्हीबाबत सांगणं खरंच गरजेचं आहे की नाही हे आधी ठरवावं. म्हणजे मला सांगा का बरं पालकांना माहीत असावं ?

**संदेश**: एकाच घरात राहून नाही सांगायचं? हे कसं होणार?, नंतर समजलं तर परिस्थिती आणखीन वाईट होईल, अगदी एकटयाला किंवा एकटीला जगावं लागलं तर... त्यांची सोबत महत्त्वाची असेल

**महेश** : त्यांना फसवलं तर इस्टेटीतला वाटा देणार नाहीत...

**ताई** : खरं तर जोडीदार सोडून इतर कोणालाही एचआयव्हीच्या लागणीबाबत माहीत असणं गरजेचं नसतं, पण त्यासाठी दोघाही जोडीदारांमध्ये खूप सामंजस्याचं नातं असायला हवं. आणि घरातील इतरांना सांगितलं तर त्यातून होणाऱ्या परिणामांची जाणीव असावी. तरीही माझ्या अनुभवानं मला असं वाटतं की अतिशय सकारात्मकतेनं आणि वैज्ञानिक रीतीनं एचआयव्हीच्या लागणीबाबत घरच्यांना सांगितलं तर बरेचदा त्यांचा आधार मिळतो. त्यातल्यात्यात जर घरातील एखादी व्यक्ती समजून घेणारी असेल तर सांगताना सोपं पडतं. आणि समुपदेशकाची मदत घेण्याचा पर्यायही इथे उपयोगी पडू शकतो.

**सरिता**: पण ताई, निगेटिव्ह जोडीदाराचे पालक समजून घेणारच नाहीत किंवा सुरुवातीला स्वतः निगेटिव्ह जोडीदार समजून घेईल गं पण नंतर एखादं भांडण झालं ना की बाहेर काढेल ते चारचौघात.

**प्रियांका** : किंवा ताई, समजा आम्ही दोघंही पॉझिटिव्ह आहोत पण त्यानं आधी घरी सांगितलं नसेल, आपापला घेत असेल डॉक्टरकडं जाऊन औषधं वगैरे अगदी नीट तरी नंतर मला असल्याचं कळल्यावर त्याला माझ्यामुळे लागण झाली असंही मला म्हणतील...

**ताई** : सुरुवातीला सोपं आणि नंतर निभवताना अवघड होईल अशी शंका एखाद्या व्यक्तीबाबत आधीच वाटतेय तर तिथे थांबावं. जोडीदार निवड ही आयुष्यभरासाठी आहे, तात्पुरती नक्कीच नाही आणि प्रियांका,

तू म्हणतेस तशी परिस्थिती असेल तर नवऱ्यानं हे तेव्हा सांगायला हवं ना की तिच्यामुळे मला झालेला नाही, आम्ही भेटण्याआधीच मला झालेला होता. तो तसं सांगेल अशी खात्री नसली तर अडचणच आहे. तरीही लग्न त्याच माणसाशी करायचंच असलं तर नवऱ्याकडच्या किमान एका समजूतदार माणसाला त्याच्या लागणीविषयी लग्नाआधीपासून माहीत आहे, असं बघावं.

**निगार** : ताई, हे सगळं आपण बोलतोय पण एवढा सगळा विचार करायला वेळही हवा नं? म्हणजे बरेचदा लग्न ठरतं आणि महिनाभरात होऊनही जातं, मग अशा वेळी सगळाच गोंधळ होईल नं ?

**ताई** : यावर वेळ देणं हाच उपाय आहे निगार, जसं आपण जातीबाबत किंवा जोडीदाराच्या निवडीबाबत पालकांसमोर ठाम रहावं असं म्हणतो तसं इथेही ठरवून करायच्या लग्नात असो वा प्रेम करून करायच्या लग्नात, तुम्ही स्वतःच्या आणि जोडीदाराच्यादेखील तयारीला वेळ द्यायलाच हवा, सगळ्या उलट-सुलट प्रश्नांवर चर्चा करायलाच हवी, विश्वास आणि प्रेम फुलायला जागा द्यायला हवी. तिथे लगेच 'लग्नाचा इव्हेंट' उरकायची घाई काहीच कामाची नाही.

**प्रियांका** : एक विचारू का ताई, रागावणार तर नाही ना?

**ताई** : नाही ग, रागावेन कशाला, विचार ना, अगदी काहीही विचार.

**प्रियांका** : आमच्या मामीची चुलत बहीण आहे ना, म्हणजे माझ्याच एवढी आहे ती, तर तिचं लग्न झालं मागच्या वर्षी. चांगला श्रीमंत वकील नवरा होता. अग, आता ती परत आलीय. डायव्होर्स घेणार म्हणतेय तर आम्ही विचारलं की का म्हणून... तर मामी काय म्हणाल्या, की त्या मुलाचं आधीचं लफडं आहे. मी मामींना म्हणाले की इतका शिकलेला मुलगा आहे तर त्यानं आधीच त्या मुलीशीच लग्न करायचं ना, हिला कशाला लग्न करून फसवायचं? तर माहितेय का, मामी म्हणाल्या त्याचं लफडं पोरीशी नाही, पोराशी आहे. मगाशी निगारनं काढला होता तो विषय पण मग पुढं गेला नाही, पण तू जरा सगळं नीट डिटेलात सांग ना.

**ताई** : बरं. तुझ्या बहिणीच्या नवऱ्याचे समलिंगी संबंध आहेत. दोन स्त्रियांमधला किंवा दोन पुरूषांमधला लैंगिकसंबंध याला समलिंगी संबंध असं म्हणतात. स्त्री-पुरुषांचे होतात ते भिन्न-लिंगी संबंध. काही व्यक्तींना दोन्ही प्रकारचे लैंगिक संबंध करण्याची इच्छाही असू शकते. तसे म्हणजे समलिंगी किंवा भिन्नलिंगी किंवा दोन्ही प्रकारचे संबंध करण्याची आवड एखाद्या व्यक्तीला असू शकते. या आवडीतही कमी-जास्त असे प्रकारही होतात, म्हणजे बिन्नलिंगी आवड जास्त किंवा समलिंगी संबंध हवेतच पण क्वचित भिन्नलिंगीही आवडतील असं. ह्यात त्या माणसाची तशी आवड म्हणून चूक-बरोबर असं काहीही आपण ठरवू शकत नाही. अर्थात समाजमान्यतेसाठी भिन्नलिंगी लग्न करायचं आणि त्यामध्ये त्या मुलीला फसवायचं हे नक्कीच चुकीचं आहे.

**प्रियांका** : मी तेच सांगतेय ना, रेवतीच्या बाबतीत तसंच झालं ना. सासरी गेल्यावर तिला कळलं की तिचा नवरा तिच्याजवळ कमी आणि त्या मित्राच्याच मागे सारखा जायचा. आधी हिला वाटलं, असेल त्यांची जवळची दोस्ती पण मग एकदोनदा त्यांच्या बेडरूममध्येच सापडले अग तिला.

**ताई** : म्हणूनच जोडीदाराशी नातं ठरवताना त्याचा आणि स्वतःचा लैंगिक कल काय आहे याचा विचार नक्की व्हावा. जोडीदार हा स्वतःच्या लैंगिक आवडीनुसार जुळणारा असेल तरच त्याच्याशी नात्याचा विचार करावा.

सरिता : पण ताई ज्यांना स्वतःची आवड/ कल माहीत आहे त्यांनी तरी असं का फसवावं अग इतरांना ?

ताई : समाजासाठी, आई-वडिलांसाठी आणि कायद्यासाठीही हे लोक तसं करतात कदाचित, आणि काहीवेळा त्यातून मुलंही होऊ दिली जातात म्हणजे मग समाजाच्या दृष्टीनं बोट ठेवायला जागा उरत नाही ...

प्रियांका : पण मग फसवलं गेलेल्या मुलींचं काय? त्यांचा ह्या सगळ्यात काय दोष ? मुलांच्या जबाबदारीसकट, एकटं म्हणजे जोडीदाराशिवाय आयुष्य काढावं की काय त्यांनी

**संदेश**: त्यांनी डायव्होर्स घ्यावा.

**प्रियांका** : हा हा म्हणे डायव्होर्स घ्यावा, इतकं सोपं नसतं मुलींसाठी डायव्होर्स घेऊन माहेरी राहणं. आणि फसवणूक तर झालीच ना. ताई, माझ्या मते या स्टोरीत समलिंगी असण्याचा फक्त संबंध नाहीये. ही फसवणुकीची स्टोरी जास्त आहे.

ताई : हो, फसवणूकीचीच आहे, त्यात एक मुद्दा मगाशी सांगायचा राहिला की समलिंगी लग्नाला आपल्या देशात कायद्याची संमती नाही. त्यामुळे समलिंगी व्यक्तींना आपल्या मनाप्रमाणे आपल्याला हव्या त्या व्यक्तीशी लग्न करण्याला कायद्याची मान्यता मिळत नाही, आणि घरचे, समाज वगैरे लग्नाचा आग्रह तर धरतच असतात. म्हणजे मी काही त्यांच्या फसवण्याची बाजू घेत नाही पण या निमित्तानं हेही आपल्याला माहीत असावं म्हणून सांगते.

सरिता : आपण तर सगळं समजणारी- जाणती माणसं आहोत. आपण कोणत्याही बाबतीत मुद्दाम फसवण्याचा विचारही करत नाही आहोत. अगदी आपल्या एचआयव्हीबाबतदेखील आपण सगळं सांगणार आहोतच, इतकंच नाही तर इथे, आज आपण काय सांगायचं, स्वतःची कशी तयारी करायची, नक्की कुठे प्रॉब्लेम असू शकतो हे सगळं समजून घेत आहोत हे किती बरं आहे ना !

**निगार** : हो. अग, लग्नाआधी आपल्याला हे सगळं समजून घ्यावंच लागेल, नाहीतर आपण आपलं फक्त हनिमूनचा, नाहीतर टीव्ही, सिनेमातल्या सारख्या छान छान प्रसंगांचा विचार करत राहतो, खरा विचार करतच नाही आणि नंतर अनपेक्षित गोष्टी पुढे आल्या तर सगळाच गोंधळ होतो.

महत्त्वाचं म्हणजे लग्नाच्या दृष्टीनं आपलं प्रेम असलेली, आपल्याशी मन जुळलेली कुणी व्यक्ती असावी; ही कल्पना सर्वात चांगली. पण अशी व्यक्ती प्रत्येकालाच भेटतेच, असं नाही पण किमान अवास्तव अपेक्षांनी नात्यात उतरणं तरी नसावं.

ताई : हो आणि उलट बाजूला भावनेच्या भरात तुम्ही मुलं-मुली प्रेमात पडता तेव्हाही मात्र मला थोडी काळजीही वाटते. लग्न हा निर्णय मन जुळण्याचा, एकमेकांची काळजी घेण्याचा, जबाबदारी स्वीकारण्याचा आहे. आयुष्याची गाठ एकमेकांसोबत बांधण्याचा आहे. त्यामुळे तो निर्णय घेताना अतिशय विचारपूर्वक आणि जाणीवपूर्वक घ्यायला हवा. लग्नापर्यंत आपण आपल्या पायावर उभे झालेलो असलो, स्वतंत्रपणे

वागत असलो तरी आपली जबाबदारी काही प्रमाणात तरी आपल्या पालकांवर असते. मात्र लग्नानंतर आपली आणि आपल्या जोडीदाराची जबाबदारी सर्वार्थानं आपल्या दोघांचीच आहे, हेही ध्यानात ठेवायला हवं. ह्या सगळ्यात आपल्याला साथ देणारा असा जोडीदार आपल्याला हवा आणि आपणही स्वतः तसा जोडीदार होण्याची तयारी करावी.

**आपल्याला जसा जोडीदार निवडीचा हक्क आहे तसाच तो समोरच्यालाही आहे, ह्याची पक्की जाणीवही आपल्याला असावी.**

**सरिता**: लग्न ही करावीच लागणारी गोष्ट, असं मानत आलेलो असतो ना आपण! म्हणजे होईलच आपोपाप असं म्हणत असतो किंवा पालकांवरच त्याचं ओझं टाकलेलं असतं...

**प्रियांका** : पण आता स्वतःची जबाबदारी घेण्याच्या ह्या टप्प्यावर स्वतःचा जोडीदार म्हणून विचार करावाच लागणार आहे.

**महेश**: हो नं! अग, कोणतीही वस्तू विकत घेताना किंवा कुठेही घराबाहेर पडताना पण ठरवून निघतो आपण, काय काम आहे? कशी वस्तू हवी? त्यात कायकाय हवं? कोणता रस्ता सोपा? सगळा विचार करतो, इथे तर आयुष्यभराच्या नात्याचा प्रश्न आहे, तेव्हा त्यासाठी स्वतःची तयारी करायलाच हवी.

## प्रकरण 3. नातं जपताना

**प्रियांका** : ताई, गेल्यावेळी आपण जे जे बोललो नं तेव्हापासून लग्नाचं, आणि मुख्य म्हणजे जोडीदाराच्या निवडीबाबतचं माझं टेन्शन बरंच कमी झालंय बरं का !

**सरिता** : कमी झालंय? माझं टेन्शन तर वाढलंय!

**निगार** : हो नं माझं पण! म्हणजे लग्नाचा विचार करताना जर डोक्याला इतकी कल्हई होत असेल तर ते लग्न टिकावं म्हणून काय काय करावं लागेल?

**ताई** : दमलात इतक्यातच? लग्न ठरवताना इतका विचार का करायचा? कारण लग्न झाल्यावर ते निभावणं आपल्याला सोपं पडावं.

**महेश** : ताई, लग्न निभवायचं म्हणजे नक्की काय म्हणायचंय तुला?

**ताई** : लग्न निभवायचं म्हणजे आपल्याला हवं असलेलं नातं दोघांनीही आनंदानं जपणं, एकमेकांचा मान राखून एकत्र जगणं!

**निगार** : पण ताई, हे सगळं जमवायचं कसं? म्हणजे आनंदानं नातं जपताना कायकाय महत्त्वाचं असतं ?

**ताई** : सर्वात आधी काही गोष्टी समजून घ्यायला हव्यात अशा आहेत, पहिली म्हणजे जोडीदाराचा स्वीकार!

**संदेश**: ताई, लग्न केलं म्हणजे स्वीकार आलाच की !

**ताई** : असं नाही होत संदेश, अरे लग्न करणं आणि ते प्रत्यक्ष जगणं ह्या खूप वेगवगळ्या गोष्टी आहेत.

लग्नानं एक नवं माणूस आपल्या बरोबर फक्त रहायला येत नसतं तर आपल्या आयुष्यातली जागा घेत असतं. मुलगी माहेर सोडून सासरी येते ती नुसत्या नव्या जागेतच नाही तर नव्या आयुष्यात येत असते. आता ती जोडीदारासोबत राहणार असते. तिच्या सवयी, वागण्याबोलण्याची पद्धत सासरघरापेक्षा वेगळी असू शकते. तेव्हा ती व्यक्ती अगदी प्रेमाची असली तरी नव्या वातावरणात काहीशी अस्वस्थ असणार आहे ह्याची आठवण तिच्या जोडीदारानं ठेवायला हवी.

**सरिता**: ताई, पण हे सगळं मुलींनाच करावं लागतं अगं!

**महेश** : असंच काही नाही. हल्ली दोघांनीही आपापली घरं सोडून दोघांचं एक नवं घर घेण्याची पद्धत असतेच की! मुलंही आपल्या आई-वडलांना सोडूनच येतात की अशा घरात राहायला.

**ताई** : मुद्दा मुलगा किंवा मुलगी इतकाच नाहीये, म्हणजे दोघांसाठीही दुसऱ्याच्या मनातली जागा घेणं आणि नव्या माणसाला सामावून घेणं हे असतंच. मुलग्यांच्या बाबतीत म्हणाल तर ... आपल्या सामाजिक व्यवस्थेत बऱ्याचदा मुलग्यांना घर सोडून जावं लागत नाही. बहुतेकदा मुलीच आपली घरं सोडून सासरी येतात म्हणूनच आपल्या घरातल्या या नव्या माणसाला समजून घेण्याची जबाबदारी मुलग्यांनी जास्त घ्यायला हवी. तिला लग्न झाल्यानंतरच्या काळात स्वीकारणारं वातावरण सासरी मिळणं खूपच महत्त्वाचं आहे.

**प्रियांका**: त्याउलट जबाबदारीच्या अपेक्षेनं तिच्याकडे पाहण्याची पद्धत आहे आपल्याकडे! त्याचंच दडपण येतं.

**ताई** : हो, तेव्हाही 'मी सोबत आहे', हा विश्वास नवऱ्यानं तिला द्यायलाच हवा. बरेचदा लग्नाच्या धामधुमीत या गोष्टी लक्षातही येत नाहीत. दुसऱ्या व्यक्तीला आपण समजावून घ्यायचं आहे, अशी सवयही मुलग्यांना सहसा नसते.

**संदेश**: आणि ताई, मुलींसाठी काय म्हणशील, त्यांनीपण समजून घ्यायचं की सगळं आम्हीच?

**ताई** : नवं माणूस आपल्या मनात, आयुष्यात, रोजच्या जगण्यात येतं तेव्हा काही बदल घडणार आहेत हे दोघांनीही समजून घ्यावं. पण संदेश, महेश तुम्ही काय यात मुलग्यांची आणि मुलींची तुलना करताय की काय?

महेश : सरळ गोड चाललेलं असलं तर काही प्रॉब्लेम येत नाही, पण भांडणं होत असली की कुणी समजावून घ्यायचं असा मुद्दा येतो.

**संदेश**: अरे पण कधी ना कधी भांडणं होणारच. कधीतरी खटके उडणारच की ...काय ग ताई?

**ताई**: काही गोष्टी एकमेकांशी न जुळणाऱ्या असतीलही, प्रत्येकच जोडप्यात असतात, पण त्यावेळी महत्त्वाचं काय, एकमेकांचे मतभेद कसे समजावून घ्यायचे, कशासाठी अडून बसायचं आणि काय न आवडलं तरी स्वीकारायचं, हे समजलं तर लग्न आनंदानं निभावता येतं.

**निगार** : स्वीकारायचं म्हणजे काय ? ॲडजस्ट करायचं हेच ना? आणि मग इथं काहीही म्हणा, प्रत्यक्षात ते मुलींनीच करायचं असाही त्याचा अर्थ होत असणार.

**ताई** : नाही निगार, ॲडजस्ट करायचं म्हटलं की एकानं नाईलाजानं जुळवून घेणं असं असतं. पण तसं असू नये, दोघांच्याही असण्याला, मताला, वागण्याला इथे महत्त्व आहे, तेही एकमेकांशी आनंदानं जुळवून घेत. ॲडजस्ट करणं आलं की कधीतरी, त्याचा ताण बाहेर येतोच आणि त्या नात्यात मग आनंद न

राहता नात्याचं ओझंच जास्त बनून राहातं. त्यापेक्षा लग्नाचं नातं जपताना, एकमेकांशी जुळवून घेणं, कधी आपलं म्हणणं तर कधी जोडीदाराचं म्हणणं ऐकणं, तर कधी परिस्थितीप्रमाणे स्वतःत बदल करायला तयार असणं हेही महत्त्वाचं वाटतं मला.

**सरिता**: पण मग ताई, कधी जुळवून घ्यायचं? आणि कधी नाही ?

**ताई**: हे बघ हं सरिता, म्हणजे जर एखाद्या मुलग्याला चमचमीत खाण्याची सवय असेल आणि मुलीला साधं जेवण आवडत असेल, किंवा उलट... तर रोजच ह्या गोष्टीशी जुळवून घेताना दोघांनाही अवघड असतं. त्यावेळी चिडून सतत बोलून दाखवणं, उपाशीच राहणं, अबोला धरणं ह्यापेक्षा इथे हळूहळू एकमेकांच्या आवडीशी जुळवून घेणं शक्य असतं... किंवा एखाद्याला खूप बोलायची सवय नसते, मोकळं व्हायला वेळ लागत असतो तर दुसऱ्याला खूप बोलायला हवं असतं, अशा वेळी एकमेकांना समजून घेत संवाद चालू ठेवायला अवघड पडतं पण एकमेकांच्या ह्या स्वभावाचा स्वीकार असेल तर जुळवून घेणं जमतं.

पण समजा, नवरा घरातलं काहीच काम करत नाही आणि उठल्यापासून चहाची ऑर्डर सोडत असेल तर त्याच्याशी आपण जुळवून घ्यायचं नाही. काही काळ बदलाला वेळ देण्याइतकं लवचीक राहावं, पण त्याला हळूहळू बदलायलाच लागेल, हे शांतपणे सांगायचं.

मुद्दा चहा करण्याचा किंवा एखादं काम करण्याचा नसतो, मुद्दा आहे की व्यक्तीच्या सन्मानाला धक्का लावणारी कोणतीही ॲडजस्ट्मेंट करायची नाही. दुसऱ्याला करायला लावायचीही नाही.

हा आणि अजून एका ठिकाणी अजिबात लवचीक राहता येणार नाही. ते म्हणजे, कंडोम न वापरता लैंगिक संबंध, तिथे अजिबात जुळवून घ्यायचं नाही किंवा चालतंय की... वगैरे म्हणायचं नाही!

एचआयव्हीसह जगात असताना
लैंगिक संबंधात प्रत्येक वेळी निरोध वापरणे अतिशय जरूरीचे आहे .
अन्य गर्भनिरोधक वापरत असलात तरीही,
संतती नियमनाची शस्त्रक्रिया झालेली असली तरीही

संकेत : ए थांबा थांबा, हा मुद्दा आत्तापर्यंतच्या मुद्द्यांपेक्षा अगदी वेगळा आहे. मला त्यात एक प्रश्नही आहे. दोघंही एचआयव्ही असलेली असली तर कशाला वापरायचा कंडोम?

ताई : *प्रत्येकाच्या शरीरातल्या एच.आय.व्ही.चा प्रकार आणि रूप थोडं वेगळं असण्याची शक्यता असते. अश्यावेळी एकमेकांच्या एच.आय.व्ही.ची वरलागण होण्याची शक्यता आहे. शिवाय एच आयव्हीशिवाय*

*लैंगिक संसर्गानं होणाऱ्या इतर आजारांपासूनही निरोध वापरल्यास संरक्षण मिळतं म्हणून दोघांनाही एचआयव्हीची लागण असतानाही निरोधचा वापर प्रत्येक संबंधाच्या वेळी करावा.*

**प्रियांका** : ते ठीक आहे, ते करूच, पण ह्याशिवायही लग्न झाल्यावर बदलणाऱ्या आणखीही गोष्टी असतात. उदा. मी नोकरी करते तर ते पैसे नवऱ्याकडे सगळेच्या सगळे द्यायचे की जर गरज पडली तर थोडे आपल्याकडे ठेवायचे? त्यावरून नंतर वाद नको म्हणून म्हटलं मी.

**सरिता**: हिचं तर प्लॅनिंगच सुरू झालं सगळं!

**ताई** : प्रियांका म्हणते, तितका खरंच खोल विचार आपण एरवी करत नाही, पण सरिता, लग्न हे दोन वेगवेगळ्या व्यवस्थेतून आलेल्या व्यक्तींचं असतं, तिथे पैशांबद्दलची मानसिकता वेगवेगळी असू शकते म्हणजे एखादा खर्चिक तर एखादा काटकसरी किंवा एखाद्याला मिरविण्याची हौस तर एखाद्याला आपल्यापुरतं ठेवण्याची! तेव्हा जोडीदाराची 'ती' मानसिकतादेखील जोडीदाराच्या स्वीकारात महत्त्वाची असते. ती खूप अवघडही असते. पण एकमेकांवरच्या प्रेमाला धक्का न लावता एकमेकांशी पूरक वागण्यातून आणि हळूहळू वाढत जाणाऱ्या सहवासातून, काही चांगला बदल दोघांमध्येही घडत असतोच आणि तो कुणासाठी म्हणून करण्यापेक्षा परिस्थितीनुसार केला जातो, ते जास्त महत्त्वाचं.

**महेश** : ताई लग्न म्हणजेच एकमेकांच्या गोष्टी... म्हणजे राहण्याची जागा, वेळ, वस्तू,पैसे यांवर आपला दोघांचा हक्क असाच रूढ अर्थ असतो ना? मग पैशाचं कसं करायचं? म्हणजे त्यावर पण दुसऱ्याचा हक्क मानायचा का? पण मग स्वतःचं म्हणूनपण काही असतंच की आपल्याला.

**ताई**: आनंदानं **लग्न निभावताना पैशांचा खर्च आणि साठवण कशी असावी** ह्यावर सुस्पष्ट संवाद असणं गरजेचं. नवऱ्याच्या किंवा बायकोच्या सगळ्या पैशांवर आपला हक्क असं मानून वागणूक असेल तर तिथे खटके उडणारच.

**सरिता**: पण मग ताई, आत्ताच्या काळात **दोघंही कमावत असतील तिथे काय करावं?**

**ताई** : ह्यात सोपा मार्ग म्हणजे दोघांनीही एकत्र ठरवून, घरासाठी देण्याचे पैसे, स्वतःच्या वैयक्तिक खर्चासाठी पैसे, ह्यावर नीट बोलावं. दोघांचंही आर्थिक बाबीतलं मत इथे महत्त्वाचं आहे. एकूण खर्चाचा कोणा एकावरच भार येणार नाही, हेही पहावं. दोघांच्याही खर्चातला ठरावीक भाग एकत्र खर्चासाठी आणि उरलेला स्वतःसाठी असं करता येऊ शकतं.

**प्रियांका**: एकूण बघता ,हा लग्नाचा पेपर जरा अवघडच आहे, नाही?

**महेश**: इतकं काही अवघड असेल असं नाही वाटत मला, म्हणजे कितीतरी चांगली कामं करणारी, लग्नाला खूप वर्षं झालेली, आनंदी जोडपी असतातच की आपल्या आजूबाजूला!

**प्रियांका** : ताई, तू म्हणतेस तसं पैशाचं नियोजन करणं ठीक आहे गं, पण जर बायको किंवा नवरा कमावत नसेल तर ?

**ताई** : आर्थिक नियोजनातदेखील मुख्य विचार स्त्री-पुरुष समानतेचा आणि एकमेकांच्या आदराचा आहे. जर दोघांपैकी कोणी एकच पैसे घरात आणत असेल तरीही हा नियम लागूच! पैशांचा खर्च हा दोघांच्या मतानंच व्हावा. घरातलं काम करणारा जोडीदार कमी महत्त्वाचा मानून, तुला काय कळतं, कमवायची तर अक्कल नाही किंवा माझ्याएवढे पैसे कमावून दाखव ... वगैरे बोलणं तर इथं घडायलाच नाही पाहिजे.

**सरिता** : ताई, हे तुझं बरोबर आहे ग, पण असं घडताना मी कधीच कुठेही पाहिलेलं नाही, घरातलं काम करणाऱ्या बायकांना कोणी पैशांबद्दल सांगतं का?

**ताई** : हेच चित्र आता बदलायला हवं. जोडीदाराचा सन्मान तर असायलाच पाहिजे. एकत्र खर्च होणार असल्यामुळे पैशांचे व्यवहार जोडीदाराबरोबर स्पष्ट केलेले असावेत, त्यामध्ये जोडीदाराला अंधारात ठेवू नये. एकमेकांच्या मदतीनं, चर्चेनं आर्थिक नियोजन केलं असेल तर सहजीवन सोपं होईल. तसंच एकमेकांच्या पडत्या काळात तू तुझं बघ, तुझ्यामुळे ही चणचण आहे, माहेरहून पैसे आण किंवा मित्रांकडून कर्ज काढ, स्वतःचा इस्टेटीतला हिस्सा माग असं काही म्हणणं तर अगदीच चुकीचं आहे.

**निगार** : ताई, काही ठिकाणी तर, नवराच सगळे पैसे वडिलांकडे किंवा आईकडे जमा करत असतो, तिथे बायकोनी काय करायचं? तिनंही सासऱ्यांकडे आपले पैसे जमा करायचे का?

**प्रियांका**: ए हे फारच आहे हं. नवऱ्याकडे पैसे द्यायलाही आपला विरोध आहे तर सासऱ्यांकडे काय द्यायचे?

निगार : पण हे सासऱ्यांना नको का कळायला?

प्रियांका : आणि नसलं समजत ना तरी नवऱ्यानं सांगायला हवं आपल्या वडलांना की आता आमचं लग्न झालंय, ती आपल्या घरात जरी आली असली तरी आपण तिच्या प्रत्येक गोष्टीवर हक्क दाखवायचं कारण नाही , अगदी मी देखील तिच्या पैशांवर हक्क दाखवणार नाही. ती तिच्या घरखर्चातला वाटा इतरांसारखा तीही देईल, पण सगळेच पैसे तुमच्याकडे द्यायची काही गरज नाही.

**निगार** : बघा ना रे, सगळीकडे मुलींच्या बाजूनी किती प्रश्न आहेत! मुलग्याच्या बाबतीत हा प्रश्नच निघणार नाही!

**सरिता** : हो नं! **मुलींना नवऱ्याबरोबरच त्याचे कितीतरी नातेवाईक 'फ्री' मिळतात आणि मुलग्यांना मात्र फक्त बायको!**

**ताई** : आपल्या सामाजिक व्यवस्थेतला हा अन्यायकारक भाग आहे. तो पूर्णतः बदलता जरी येत नसला तरी एकमेकांच्या अर्थपूर्ण सोबतीतून ह्यावर सोपे तोडगे निघू शकतात. म्हणजे बायकोला आईकडून होणारा त्रास हा बायकोचा प्रश्न नसून तो दोघांचाही प्रश्न आहे हे मुळात नवऱ्यानं समजून घेतलं पाहिजे.

**प्रियांका** : समजलं का रे पोरांनो ?

महेश : फक्त मुलांसाठी नाही आहे हे प्रियांका! जसा प्रश्न एकटया बायकोनं सोडवायचा नाही तसा एकटया नवऱ्यानंदेखील नाही!म्हणजे नवऱ्याचं काही कारणानं बायकोच्या नातेवाईकांबरोबरचं अवघडलेपण असेल तर तेही दोघांनी सोडवलं पाहिजे. म्हणजे काहीवेळा सतत राहाणीमानावरून बोलल्यामुळे, किंवा खूपच मस्करीच्या वातावरणात नवऱ्याला अवघडल्यासारख वाटत असेल तर, तिथे बायकोनेही आपल्या नातेवाईकांशी बोलायला हवं.

ताई : हो आणि इथे अजून एक मुद्दा असतो नातेवाईकांमधली बरोबरी किंवा तुलना! . म्हणजे तू पण माझ्या भाऊजींसारखा बिझनेस कर, किंवा तू माझ्या वहिनीसारखी टापटीप रहात जा अस बोलणं तर सहज टाळण्यासारखं दिसतं मला.!

निगार: आणि ताई . अजून एक महत्वाचं ते म्हणजे एकमेकांविषयी चुकूनही इतर कोणाकडे वाईट बोलायचं नाही कारण एकमेकांबद्दल इतरांना न सांगणं हा नात्यातल्या विश्वासाचा मुद्दा असतो हो ना? म्हणजे अगदी जवळच्या मित्र-मैत्रीणीना देखील एकमेकांच्या खासगी गोष्टींबद्दल काही सांगायचं नाही..

ताई : हो निगार हा खूपच महत्वाचा मुद्दा आहे , जोडीदार हे नातंच एकमेकांच्या आपलेपणावर, विश्वासावर आधारलेलं असत, एकमेकांविषयी खासगी माहिती इतरांना सांगून आपण त्या नात्याचा अनादर करत असतो.

आणि हे अगदी आपल्या एचआयव्ही लागणीबाबतही लागू आहेच..

**संदेश** : ताई, नातेवाईक वगैरे सगळे करू आम्ही मॅनेज,पण ह्या मुलींचं एक सतत म्हणणं असत ना, ते काही मला समजत नाही,म्हणजे तू मला वेळच देत नाहीस, मित्रांशी कसा बोलत असतोस वगैरे असतं ना ह्या मुलींचं लग्नानंतर! त्याला कसं काय उत्तर द्यायचं? का सगळे मित्रमैत्रिणी सोडून द्यायचे आम्ही?

**ताई** : नाही संदेश, मित्रमैत्रिणी सोडून मुलग्यांनी द्यायचे नाहीत तसे मुलीही ते सोडणार नाहीत, हेही बघ बरंका.

एकालाच मोकळीक आणि एकाला अजिबात नाही असं असू नये. म्हणजे नवऱ्याचे मित्र रोज संध्याकाळी भेटणार आणि बायकोला मात्र बाहेर पडायलाही अवघड, असं घडू नये

**महेश**: म्हणजे ताई, आर्थिक गोष्टीत किंवा नातेवाईक, मित्रमैत्रिणींच्या बरोबर वेळ देणं सगळीकडे आपण एकमेकांची बरोबरी करायची का ?

**ताई**: बरोबरी तर नाहीच महेश, उलट आजच्या परिस्थितीत मुलींना मोकळिक जास्त मिळावी, त्यासाठी निदान तुमच्यासारख्या विचार करणाऱ्या मुलग्यांकडून प्रोत्साहन मिळावं असं म्हणते आहे मी. आजच्या काळात लग्नाच्या वेळीच नाही तर इतर वेळीही हा मुद्दा अतिशय बारकाईनं समजून घेण्यासारखा आहे. बदलत्या काळात दोघांचं आयुष्यातलं स्थान, भूमिका ह्या पूर्वीपेक्षा खूपच बदललेल्या आहेत. मुलींना पूर्वीसारखं कमी शिक्षण किंवा पैसे कमवण्याचा आणि खर्च करण्याचा हक्क नाही अशी परिस्थिती नाही. ह्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे स्वतःची जाणीव त्यांना झालेली आहे. आजकालच्या बदलत्या भूमिकांमुळे सहजीवनात गडबड होते कारण समतेचा, सन्मानाचा मुद्दा यापूर्वी विचारातच घेतलेला नसायचा.

**संदेश**: पण ताई, म्हणजे वागायचं कसं ? आम्ही आजवर पुरुषांना घरात जसं वागताना पाहिलं तसंच आम्ही वागणार ना.

**ताई**: तिथेच तर बदल करायला हवा आहे ना. अगदी साधं उदाहरण द्यायचं तर घरातलं काम म्हणजे स्वैपाक, धुणं-भांडी, केरवारे जे काही असेल ते फक्त बाईनं करावं अशी अपेक्षा असता कामा नये. ती कामं दोघांनीही बरोबरीनं करणं म्हणजे समानता. उदा. स्त्रियांना मुलं जन्माला आल्यानंतर सुरुवातीचा काही काळ मुलाला द्यावा लागणारच असतो, तेव्हा 'हे तर तुझं कर्तव्यच' असं न म्हणता तिथे त्या वेळेचा आदर दाखवणं म्हणजे समता. बायको नोकरी करते, पण मी तिच्यापेक्षा जास्त कमावतो, तेव्हा माझ्या जास्तीच्या पगाराची भरपाई म्हणजे तिनं घरातलं कामही करावं हा विचार चुकीचा. त्यापेक्षा दोघांनीही गरजेप्रमाणे घर आणि आर्थिक जबाबदाऱ्या घेणं आणि दुसऱ्या व्यक्तीबद्दल आदराची भावना असणं ही समानता.

**निगार** : हो ना! आपण समतेनं-आदरानं वागलो तर आपली मुलं पण तशीच वागतील ना? पुढे तर हा विषय आणखीनच महत्त्वाचा होत जाणार आहे...

**ताई** : अरे वा निगार, खरंय तुझं, आपल्या वागणुकीचा फक्त आपल्यावरच नाही तर इतर समाजावर, विशेषतः आपल्या मुलांवर खूपच परिणाम होत असतो.

**प्रियांका** : ए थांब, मुलांपर्यंत पोचण्याआधी लैंगिक जीवनाबद्दल बोलू. आपल्याला आपल्या लैंगिकतेची नीट माहिती असायला हवी. आपला लैंगिक कल म्हणजे आपल्याला भिन्नलिंगी संबंधांची ओढ आहे का

समलिंगी ह्याची आपल्याला जाण असणं आणि आपल्या जोडीदाराला आपण त्याबद्दल सांगणं वगैरे. ते बोलूया ना.

**ताई** : हो. लैंगिक संबंध ही एकमेकांच्या आनंदाची गोष्ट आहे. ह्यातलं एकमेकांवरच अवलंबून असणं समजून घेतलं तर लैंगिक जीवन दोघांसाठीही आनंदी होतं. कधीकधी काही कारणांनी सेक्स करताना एकमेकांशी जुळवून घेता येत नाही.

आत्ता आपण ह्या मुद्द्यावर खूप बोलू शकू असं नाही, पण एक गोष्ट नक्की सांगते, अश्या परिस्थितीत समुपदेशकाचा सल्ला घेणं खूप मदतीचं होतं. एकमेकांबद्दलचा आपलेपणा मनात असला हे प्रश्न लवकर सुटतात असं मला वाटतं. माझ्याकडे समुपदेशनाला आलेल्यांपैकी एका उदाहरणात त्यातल्या मुलग्यानं म्हणजे समजू गौरवनं , तर गौरवनं लग्नाच्या सुरुवातीच्या काळात जाहिरातींच्या प्रभावामुळे खूप औषधं वगैरे घेतली. औषधं म्हणजे जास्त काळ संबंध करता यावेत अशा समजुतीनं घेतली जाणारी औषधं हं. त्यामुळे पूजाला खूप वेदना होत. पूजानं आधी त्याला खूप समजावलं, की औषधं न घेताच संबंध करावेत, पण गौरवला तसा आत्मविश्वास वाटत नव्हता.

शेवटी पूजा माहेरी निघून गेली, नंतर गौरवच्या एका मित्रानं मदत केली, डॉक्टरांशी बोलणं झालं, गौरवलाही पटलं. त्यानं पूजाची माफी मागून तिला घरी यायची विनंती केली. ताणाच्या ह्या प्रसंगाच्या नंतर दोघंही अधिक समजुतीनं एकमेकांशी वागू लागली. गौरवला औषधं न घेता संबंध करण्याचा आत्मविश्वासच आधी नव्हता, पण थोडे दिवसांनी त्यांचंही लैंगिक आयुष्य नीट व्हायला लागलं. आत्तापुरता मुद्दा एवढाच की, काही प्रश्न आलाच तर आधी एकमेकांशी बोला आणि तरीही प्रश्न उरलाच तर समुपदेशकाशी बोला, एवढ्यावरच थांबवूया.

**प्रियांका** : अजून एक गोष्ट मला बोलायचीये, म्हणजे तसं गेल्यावेळी आपण बोललो आहोतच की आपल्या आधीच्या आयुष्यातल्या ज्या गोष्टीचा परिणाम आपल्यावर होऊ शकतो अशा गोष्टी लग्नाआधी जोडीदाराशी बोलाव्यात. पण जोडीदारानंही ते समजावून घ्यायला हवं ना, नाहीतर आपण सांगून बसायचं आणि जोडीदार मात्र त्या गोष्टीचं भांडवल करून मुद्दाम टोचून बोलत राहिला तर ....

**सरिता** : वादच होणार ना मग?

**ताई** : दोघांसाठी एकमेकांवरच्या विश्वासाचा एक भाग म्हणून आपल्या जोडीदारानं आपल्याला सांगितलंय ह्याचं भान हवंच. त्यावरून त्रास देणं हा तर विश्वासाचा गैरफायदा घेणं होईल.

**प्रियांका** : आणि लग्न झाल्यावर अजून एक नातं ठेवून फसवण्याचा मुद्दा आला तर ?

**ताई** :असं वागणं सहज समजून घेण्यासारखं नक्कीच नाहीये, पण त्याबाबत संयमानं विचार केला तर उत्तर शोधता येऊ शकतं. शोधावंच लागतं. मला तरी एकावेळी दोन नात्यात असणं अवघड वाटतं. पण तरीही अशा गोष्टी, आपल्याकडून किंवा जोडीदाराकडून घडू शकतात ह्याची शक्यता आपण ध्यानात घ्यावी.

**महेश** : पण ताई, **अगदी पटत नसेल अशी परिस्थिती असेल तर**... म्हणजे उदाहरणच द्यायचं तर माझ्या भावानं नुकताच घटस्फोटासाठी अर्ज केलाय. त्या दोघांचे वाद, वागणं सगळंच एकमेकांना सहन करण्यापलीकडे गेल्यावर त्या दोघांनी हा निर्णय घेतला, म्हणून विचारतोय मी...

**ताई** : हो**,** असं होऊ शकतं आणि तसं झालं तर त्याबद्दल स्वत:ला दोष देऊ नये. जमवून घेणं शक्य आहे का बघावं पण नसेलच जमण्याजोगं तर शक्यतो लवकरात लवकर त्या नात्यातून बाहेर पडावं, असं मला वाटतं.

अजून एक, हे ताणाचे प्रसंग नातं खिळखिळंच करतात असं नाही, तर बरेचदा ते नातं अजून घट्टही करतात. अनेक जोडपी अशा ताणानंतर पूर्वीपेक्षा अधिक बोलकी झालेली मला दिसली आहेत तर काही जोडपी सामंजस्यानं वेगळी होण्याचा निर्णयदेखील घेतात. ज्याच्यात्याच्यासाठीचा प्रश्न वेगळा असतो, तो भावनेच्या आहारी न जाता, खूप रडून स्वतःला त्रास करून न घेता, वास्तवाला धरून सोडवता येणं जास्त महत्त्वाचं असतं.

**सरिता** : प्रियांका, तुझी वाद घालायची सवय, पुढे जाऊन तुझ्या कामी येणार असं दिसतंय बरं का!

**प्रियांका** : हो. मग वाद अच्छे है!

**निगार**: **एकमेकांशी चर्चा करणं, ह्यातच जोडीदाराचं आपल्यासाठी असलेलं महत्त्व दिसतं**. पण तेच घडताना दिसत नाही ना आपल्याला!

ताई, अजून एक वेगळाच मुद्दा दिसतो मला, म्हणजे माझंही असंच होतं म्हणून सांगते, की काहीही झालं की ते आपल्या लागणीमुळे आहे असं वाटायचं! म्हणजे थोडं जरी आजारी पडलं किंवा कोणी काही बोललं तर सगळा दोष मी माझ्या एचआयव्हीच्या लागणीला द्यायची किंवा एचआयव्ही नसता तर आयुष्य चांगलं झालं असतं, सगळं भारीच झालं असतं असाच विचार माझ्या मनात पूर्वी यायचा, पण माझ्या इथल्या मित्रांना पाहिलं आणि नीट शांतपणे विचार केला की प्रश्न एच आयव्ही शिवायही आहेत आणि एच आयव्ही हा तर आता फारसा प्रश्नच उरलेला नाहीये हे जाणवलंय मला.

**ताई**: हो निगार, असं आपल्या लागणीला इतर गोष्टींशी जोडून घेत राहाणं होत असेल, तर ते चूकच आहे हे मलाही पटतं, उलट तुम्ही मुलं म्हणता तसं सो व्हॉट ! हे फार ग्रेट आहे.

संदेश, तू कसल्या विचारत पडला आहेस रे?

**संदेश**: ताई, लग्न म्हणजे जरी एकमेकांशी आयुष्यभरासाठी जोडलं जाणं असलं तरीही, तिथे दोन स्वतंत्र व्यक्ती असतातच ना! आपापले विचार, आयुष्याकडून काही गोष्टी हव्या असणं, हे प्रत्येकाचं आपापलं स्वतंत्र असतंच, त्यात एक साथीदार मिळत असेल हीच काय ती भर असेल ना.

**ताई** : हो. संदेश, एकत्र राहणं जरी असलं तरी उलट बाजूला, स्वतःसाठी नव्या लोकांना भेटणं, वाचन, मित्र-मैत्रिणी, कामासाठी काही नवं शिकणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे. अर्थात एकमेकांसाठी खास वेळ हाही हवाच; त्यानं नात्यातला आनंद वाढत राहतो. एकमेकांसाठी काहीतरी करत राहाणं, घरातलं कामं एकत्र करणं, मोकळ्या हवेत भटकणं हे सगळंपण खूप महत्त्वाचं आहे !

**संदेश** : हं, आपण लग्न का करत आहोत ते आपल्याला माहीत असणं, जोडीदाराच्या निवडीमागे स्वतःचा सारासार विचार असणं आणि त्याचबरोबर लग्न आनंदानं जपणं, हे सगळंच समजून घेण्यासाठी सुद्धा माझ्यासाठी तरी खूपच नवं आहे.

**प्रियांका**: आपल्या सगळ्यांच्या चर्चेतून कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या नं आपल्या? थोडं अवघड दिसतंय खरं, पण हे सगळं समजून घेणंही मजेचं वाटतंय मला.

**लग्न जपताना हे महत्त्वाचं...**

- सततचा संवाद, मोकळं बोलणं, हे नातं जपताना महत्त्वाचं आहे. ताणाच्या प्रसंगी संवाद अतिशय महत्त्वाचा आहे, तसाच तो आनंदाच्या शांत आणि सहज चालणाऱ्या रोजच्या आयुष्यातही महत्त्वाचा आहे.
- कोणत्याही गोष्टीचा संबंध एचआयव्हीशी जोडू नये, म्हणजे काही कारणांनी जोडीदाराशी मतभेद झाले, त्यातून चिडचिड होत असली किंवा साधं आजारपण आलं की एचआयव्ही आहे म्हणूनच हे सगळं घडत आहे, असं म्हणत राहू नये.
- एचआयव्ही नसता तर चांगला जोडीदार मिळाला असता, मी अधिक चांगलं काही करू शकले/शकलो असते असा विचार नक्कीच टाळावा.
- कोणतेही मतभेद, भांडण किंवा जोडीदाराची न आवडलेली गोष्ट, जोडीदाराशी संवाद करून वेळीच मिटवावी तसंच एखादी आवडलेली वागणूकदेखील बोलून दाखवावी.
- जोडीदार हा पूर्णपणे वेगळ्या वातावरणातून आलेला आहे, त्याची वागणूक, वावर हा त्याच्या परिस्थितीशी अनुरूप असतो. तो त्याच्या जागी योग्य असतो म्हणूनच त्याची प्रत्येक गोष्ट आपल्या मनाजोगती व्हावी अशी अपेक्षा ठेवू नये.

- एकमेकांसाठीचा वेळ ही अतिशय अमूल्य गोष्ट असते तेव्हा सहजीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर तिचा विसर पडू देऊ नये.
- एकमेकांचा सर्वार्थानं सन्मान हे सहजीवनाचं तत्त्व आहे, तिथे पुरुष म्हणून वरचढपणा आणि स्त्री म्हणून तडजोड अशी समीकरणं नसावीत.
- नातं जपण्याची, फुलवण्याची जबाबदारी दोन्ही जोडीदारांची आहे हे समजणं आणि तसं वागणं महत्त्वाचं आहे
- जोडीदारांचं एकमेकांशी आनंदी आणि तणावरहित नातं असेल तरच मूल होण्यासंबंधी विचार करून मगच निर्णय घ्यावा.
- मूल वाढवणं हे अतिशय जबाबदारीचं काम आहे. त्याच वेळी जोडीदार म्हणून नातं अधिक बहरावं म्हणूनदेखील प्रयत्न करावे लागत असतात. तेव्हा त्याची जाणीव ठेवून वागणूक असावी
- जोडीदाराशी निखळ आणि आनंदी नातं असेल तर असं वातावरण मुलांच्या वाढीलादेखील पोषक ठरतं.

## प्रकरण 5. एचआयव्हीसह पालक होताना

ह्यावेळी निगारबरोबर ईशान आला होता.

**निगार**: ताई, हा ईशान, मी ईशानला आपली सगळी चर्चा सांगितली आहे, त्याला आपल्या सगळ्यांना भेटायचं आहे. आपल्या चर्चेत यायचं आहे. त्यालाही काही प्रश्न आहेत...

महेश : हॅलो ईशान, बरं झालं तू आलास, खरतरं तू आधीच यायला हवं होतंस आम्ही खूप महत्वाच्या विषयावर बोलतो आहोत अरे.

ईशान : अरे, मला माहितीये, तुमच्या चर्चेचा रोजचा आखोंदेखा हाल मला निगार सांगायची की! पण आज मला राहवेना, मला प्रत्यक्ष चर्चेत सहभागी व्हायचं होत, म्हणून आलो मी.

सरिता : आणि आजचा विषयच तसा आहे ना ! तो म्हणजे एचआयव्हीसह जगताना पालक होण्याचा निर्णय घेताना कायकाय लक्षात घ्यायचं......

**निगार** : ए पण ताई, एचआयव्ही असताना आणि एचआयव्ही नसताना पालक होण्यात तसा काहीच फरक नसतो ना? म्हणजे आत्तातर एवढी उत्तम औषधे आहेत त्यामुळे, पालक म्हणून आपण तर व्यवस्थित हेल्दी आहोतच आणि बाळतर निगेटीव्हच होणार ना, म्हणून म्हणतेय मी

**ताई** : बरोबर आहे. पूर्वी आईकडून बाळाला लागणीची शक्यता आत्तापेक्षा बरीच जास्त होती, म्हणजे आता उपलब्ध असतात तशी औषधं तेव्हा नव्हती. पण आता उत्तम औषधे असल्याने, औषधे नियमित घेणं आणि व्हायरल लोड -सीडीफोर या तपासण्या सोडून एचआयव्हीसह पालक होण्यात काहीच फरक नाहीये.

**ईशान** : **एक मिनिट, ह्यासगळ्याआधी मला दोन प्रश्न आहेत. दोघातल्या एकाला एचआयव्ही असेल तर आता एआरटी असताना दुसऱ्याला होण्याची शक्यता किती? आणि निगारने तुमची आधीची चर्चा सांगितली तिथे तर सारखं कन्डोमच वापरायचाच असं तुम्ही म्हणताय मग असं असेल तर मूल होणार कसं ?**

**महेश** : ताई तू थांब ग, मी सांगतो, एक जोडीदार निगेटिव्ह आणि एक पॉझिटिव्ह असेल समजा, बायको पॉझिटिव्ह आणि नवरा निगेटिव्ह,

बायको तिची एआरटीची औषध वेळेवर घेत असणार म्हणजे तिच्या रक्तातील एचआयव्हीच्या विषाणूच प्रमाण अगदी नही के बराबर असणार ह्यामुळे निगेटिव्ह जोडीदाराला लागण होण्याची शक्यताही नही के बराबरच. पण तरीही आणखी खात्रीसाठी कंडोम वापरावा, आणि मूल हवं असेल तर डॉक्टरांच्या

मदतीनं, निगेटिव्ह जोडीदाराला आधीच एचआयव्ही होऊ नये म्हणून औषधे द्यायची, ज्यांना प्रेप म्हणजे प्री-एक्स्पोजर प्रोफिलॅक्सीस अस म्हणतात अशी औषध घेतल्यावर नेमक्या गर्भधारणेच्या वेळेनुसारच कंडोम न वापरता संबंध येऊ द्यायचे. अशा पद्धतीनं निगेटिव्ह जोडीदाराला लागण होणार नाही आणि ह्यातून .. प्रेग्नंसीही राहू देता येईल.

आणि प्रेग्नंसी राहिल्यावर त्या आईच्या रक्तात विषाणूचं प्रमाण जवळपास शून्य असल्यानं बाळाला एचआयव्ही होण्याची शक्यतादेखील जवळपास शून्य होते. आणि तरीही अधिक काळजी म्हणून बाळालाही काही औषधं देतात. त्यामुळे बाळ एचआयव्ही नसलेलं होण्याची शक्यता जवळपास १००% होते. अशा पद्धतीने आमच्या गटातल्या अनेक मित्र-मैत्रीणींना एचआयव्ही निगेटिव्ह बाळंही झालेली आहेत. एकाही बाळाला एचआयव्ही झाला नाही.

ताई: अरे वा महेश तू तर एकदम तयार झालास! सगळं व्यवस्थित सांगितलंस की!

ईशान : आणि समजा याउलट म्हणजे मुलगा एचआयव्ही असलेला आणि मुलगी मात्र एचआयव्ही नसलेली असेल तिथे काय करायचं

महेश : तिथेही सगळं तेच. नियमित औषधांमुळे एचआयव्हीच्या विषाणूंचं रक्तातील प्रमाण जवळपास शून्य असणार,म्हणजे निगेटिव्ह जोडीदाराला लागण होण्याची शक्यतापण कमी होणार. पण तरीही अगदी काहीच शक्यता उरू नये म्हणून कंडोम वापरावाच, आणि मूल हवं असेल तर डॉक्टरांच्या मदतीनं, निगेटिव्ह जोडीदाराला आधीच एचआयव्ही होऊ नये म्हणूनची प्रेप औषधे द्यायची, आणि डॉक्टर सांगतील फक्त तेंव्हाच कंडोम न वापरता संबंध येऊ द्यायचे. इथे तर आई निगेटिव्ह असल्यानं बाळाला एचआयव्ही होण्याचा प्रश्नच नाही.

संदेश: आणि ताई दोन्हीही जोडीदार एचआयव्ही असलेले असतील तर, प्रेप किंवा पेप म्हणजे एच आयव्हीची शक्यता देणाऱ्या घटनेनंतरची प्रतिबंधक उपाययोजना असं काहीच कराव लागणार नाही ना , तिथे तर त्यांची स्वतःची औषधं नीट घेणंच महत्वाचं आहे.

ताई : हो, पण तिथेही एरवी म्हणजे जेंव्हा बाळ नको असेल तेंव्हा निरोध वापरावाच. त्याबद्दल आपण आधीच बोललो आहोतच.

संदेश: ताई, मला अजून एक शंका आहे म्हणजे बघ न माझ्या लहान बहिणीला नाही झाला एचआयव्ही पण मला झाला असं कसं , म्हणजे आम्ही एकाच आईच्या पोटात वाढलो न, मग तरी ...

ताई : बाळ आईच्या पोटात वाढतं. तरीही बाळाचा आईच्या रक्ताशी थेट संपर्क बाळ आईच्या पोटात असताना क्वचितच येतो. वारेतून बाळाला गाळून पोषण मिळतं, आईचं रक्त बाळाच्या रक्तात थेट

मिसळत नाही, बाळंतपणादरम्यान मात्र आईचं रक्त बाळाच्या शरीराला लागतं, क्वचित बाळाची नाजूक त्वचा खरचटलीही जाते, किंवा बाळाच्या जन्मानंतर आईचं दूध बाळाचं पोषण करतं. या तीनही गर्भारपण, बाळंतपण, आणि आईचं दूध पिण्यातून वेळेस बाळाला एचआयव्हीची लागण होण्याची थोडीथोडी शक्यता असते. अर्थात ही सगळी परिस्थिती आईला  औषधं मिळत नसतानाची आहे. आता औषधं असल्यानं आईच्या रक्तातला एचआयव्हीच नगण्य उरत असल्यानं ह्या तीनही शक्यता जवळजवळ संपलेल्याच आहेत. **अर्थात औषधं घेत राहाणं ही यातली कळीची बाब आहे,** तशी घेतली नाहीत, आणि रक्तात एचआयव्हीचं प्रमाण वाढलं तर मात्र सांगता येणार नाही रे बाबांनो.

सरिता : ताई अजून एक शंका, एचआयव्ही असलेली आई तिच्या बाळाला दूध पाजू शकते का**?** माझी आई सारखी मला दूध पाजलं म्हणून लागण झाली असं म्हणत राहते म्हणून तुला परत विचारते.

ताई : सांगितलं ना मी आत्ताच. एच.आय.व्ही. असलेली आई बाळाला आपलें दूध नक्कीच पाजू शकते. स्तनपानाच्या काळातही आई औषधं घेत असल्यानं आईच्या रक्तात आणि त्यापासून बनणाऱ्या आईच्या दुधात एचआयव्ही उरत नाही.

**निगार** : म्हणजे मूल हा मुद्दा आता तसा एचआयव्हीशी जोडलेला असा उरलेलाच नाही. दोघांनी लग्न केलं, मूल झालं, ते एचआयव्ही निगेटीव्हच होणार. आता माझ्या मनात एक्च प्रश्न उरतोय, आपल्या एचआयव्ही लागणीबाबत आपल्या मुलाला म्हणजे थोडा मोठा झाल्यावर सांगायला हवं का?

मी माझा अनुभव सांगते, मला स्वतःची लागण समजण्याआधी घरातलं वातावरण काहीसं वेगळं असायचं, एक म्हणजे माझ्यापासून काहीतरी लपवण्याचा प्रकार असे आणि दुसरं म्हणजे अम्मी-अब्बांच्या चेहऱ्यावर कायम निराशा दिसत असे. त्यांच्याबद्दल मला फार काळजी वाटत असे. आईवडिलांना आहे, मग तुलाही असणार! असं फुफी सारखं म्हणायची आणि त्यांच्या घरी जेवायला वेगळी थाळी द्यायचे, त्यांच्या मुलांच्यामध्ये मिसळू द्यायचे नाहीत. मला फार वाईट वाटायचं तेव्हा! आणि नंतर मला माझ्या लागणीबद्दल समजलं तेव्हा तर जवळच्या मैत्रिणींशीदेखील बोलत नसे मी. पण... नंतर ताईशी बोलल्यावर आणि स्वतःच्या, अम्मीअब्बांच्या एचआयव्ही आणि तब्येतीबाबत समजायला लागल्यावर मी मोकळी होत गेले. दोष देत बसले नाही. मुळात इतर लोकांना याविषयी नेमकी माहिती नव्हती हा त्यांचा दोष होता, मग मी कशाला वाईट वाटून घ्यायचं?  हे मला हळूहळू समजायला लागलं. पण तेव्हाच जर घरात आणि आजूबाजूला हसतं-खेळतं वातावरण असतं तर तो काळ माझ्यासाठी अधिक आनंदी झाला असता कदाचित...

**ताई** : मुलांना सांगायचं की नाही, ही पालकांची अगदी खासगी बाब आहे. पण घरातील इतरांकडून पालकांना एचआयव्ही असल्याचं जर बाळांना समजणार असेल आणि त्याचा अर्थ न कळल्यानं त्यांना त्रास

होणार असेल, तरच काळजीपूर्वक कोणताही ताण न देता लागणीबद्दल सांगावं. माझ्या अनुभवानुसार, नीट सांगितलं तर मुलं आईवडिलांची लागण समजून घेताना दिसतात. पण सध्याच्या परिस्थितीत औषध घेणं ही एकमेव बाब एचआयव्ही आहे म्हणून करावी लागतेय. तेंव्हा मुळातच पालकांना फार ताण वाटायलाच नको. मग मुलांना सांगण्याची गरज उरत नाही.

**ईशान** : आणि मुलांसमोर ताण येणार नाही ही जबाबदारी दोन्ही पालकांची आहे. म्हणजे जिथं एचआयव्हीसह जगणारा एकच जोडीदार असेल तिथेही त्या पालकाबद्दल मुलांसमोर वाईट बोललं जाणार नाही असं पाहावं लागेल.

**महेश** : इथे तुमच्या दोघांच्या नात्याबद्दलचा प्रश्न उभा राहतो रे, म्हणजे आपण म्हणतो तसं सारासार विचार करून लग्न झालं असेल तिथे एका जोडीदारानं दुसऱ्याशी असं वागायचा प्रश्न येतच नाही.

**सरिता** : हो ना! मूल होण्याचा निर्णयच चांगल्या आनंदी - संवादी नात्यावर अवलंबून असेल, तिथे असे प्रश्न येऊ नयेत.

**ईशान** : पण कसा घ्यायचा हा निर्णय?

**ताई** : जोडीदारांचं एकमेकांशी समानतेनं, आदरानं आणि समाधानानं सहजीवन चालू असेल, कोणत्याही आग्रहाला वगैरे बळी न पडता, मूल वाढवण्याच्या जाणिवेचा पूर्ण स्वीकार असेल तरच दोघांच्या विचारांती मूल होऊ द्यावं. त्याचबरोबर होणारं बाळ निरोगी असावं म्हणून शारीरिक तयारीसाठी डॉक्टरांची मदत नक्की घ्यावी. एचआयव्हीसह पालक होताना तर ह्याबाबत अधिक सजगपणे निर्णय व्हावा. एक तर बाळाला एचआयव्ही व्हायला नको याची संपूर्ण काळजी घ्यायचीच, शिवाय आपल्या तब्येतीची काळजी म्हणजे नियमित एआरटी घेणं वगैरे याकडे लक्ष द्यायला हवं.

**महेश** : हे बघा, हे सगळं ठीक आहे, पण मला नेहमीप्रमाणे बेसिक प्रश्न पडलेलाच आहे. **आपल्याला मूल कशासाठी हवं असतं?**

**सरिता**: हा काय प्रश्न झाला का महेश? मूल कशासाठी हवं असतं तर आपल्याला आईवडील व्हायचं असतं ना म्हणून!

**महेश**: का व्हायचं असतं आईवडील? आपलं नाव पुढे चालू राहावं म्हणून...?

**ईशान**: काहीतरी निर्माण केल्याचा आनंद हवा म्हणून... आई-बाप आहोत ह्या कल्पनेचाच आनंद होतो म्हणून...

**प्रियांका** : (चाचरत) काही आईवडलांना आणि घरातल्या इतरांनाही मुलगा व्हायला हवा असतो, म्हणून ...

**निगार** : मुलगाच कशासाठी हवा असतो? वंश सुरू राहावा म्हणून ?

**महेश** : मुलगी वंश चालवत नाही का?

**संदेश** : मुलींचं लग्न झाल्यावर त्या दुसऱ्याच्या घरी जातात. वंश चालवायला त्या उपयोगी नसतात.

**सरिता** : संदेश, मार खाशील बरं का. कालच आपण समानतेबद्दल बोललेलो आहोत. तेव्हा आज पुन्हा फिरून फिरून भोपळे चौकात जायचं नाही.

**निगार** : असं काय बोलता रे, ज्या नैसर्गिक आविष्कारामुळे आपलं अस्तित्व आहे, तो आपल्यालाही अनुभवता यावा म्हणून मूल हवं असतं आपल्याला.

**ताई** : आता थोडं मी बोलते. तुम्ही म्हणलात ना ही अशीच कारणं असतात 'मूल हवं' ह्यामागे, तुम्हाला ऐकून जरा वेगळं वाटेल पण कोणतंही कारण पाहिलं तरी मूल जन्माला येण्यामागे पालकांच्याच फायद्याचा विचार असतो. म्हणजे मला आई व्हायचंय म्हणून, मला माझं नाव पुढे चालू ठेवायचं म्हणून, मुलगी वाढवायला मिळावी म्हणून, काहीतरी निर्माण केल्याचा आनंद हवा म्हणून वगैरे अनेक कारणं सांगितली जातात. ह्या सगळ्यातही मूल जन्माला घालण्यामध्ये माझा म्हातारपणीचा आधार असा छुपा विचारही असू शकतो. एक लक्षात ठेवा, कोणतंही कारण असू द्या, **मूल जन्माला येणं हा विचार पालकांचा असतो. त्या बाळाचा नाही!** हे ठीकच आहे, पण मूल जन्माला आल्यावर त्याला आपले निर्णय स्वत: घेण्यासाठी सक्षम करायचं हे पालकत्त्वाचं मुख्य तत्त्व आहे.

हे सगळं सांगण्यामागे मुख्य हेतू हा की मूल हे 'आपल्याला हवं तसं वागण्याची जागा' किंवा 'पालकांनी अधिकार गाजवायची जागा' नाही! सुरुवातीच्या वाढीच्या काळात कदाचित मुलाच्या वतीनं निर्णय घ्यावे लागतात, म्हणजे कुठल्या शाळेत मुलाला घालायचं, मराठी माध्यमात की इंग्रजी माध्यमात, कोणत्या वातावरणात मूल वाढेल, (घरात, पाळणाघरात, कोणा नातेवाईकाकडे, गावात, शहरात) हे ठरवणं वगैरे. पण पुढे जाऊन मुलांकडून त्या निर्णयाला दोष दिला जाणार नाही, इतका तो निर्णय विचार करून घेतलेला असावा. त्या निर्णयाची जबाबदारी आणि बांधिलकी पालक म्हणून आपल्यावर आहे हेही आपल्याला माहीत असावं.

हे सगळं जसं महत्त्वाचं तसंच पुढे जाऊन आम्ही तुमच्यासाठी हे केलं, ते केलं म्हणण्याचीदेखील गरज नाही. मुळात तुम्हाला आईवडील व्हायचं म्हणून बाळांना जन्माला घातलेलं असतं. खूपदा आम्ही इतक्या खस्ता खाऊन तुम्हाला जन्माला घातलं, आईनं नऊ महिने पोटात वाढवलं, केवढे उपकार केले असं आईवडील म्हणतात. ही उपकाराची भाषा योग्यच नाही. तुम्ही त्यांना दिलेल्या प्रेमाची-लाडाच्या परतफेडीची अपेक्षा स्वतःच्या म्हातारपणासाठी म्हणून नको. उलट आपलेपणाचं असं कोणीतरी आपल्या आयुष्यात

आहे ही जाणीव आपल्याला मूल झाल्यामुळे मिळते. प्रेमाची परतफेड या प्रेमानंच होते. ह्या अर्थानं मुलं ही आपली क्षमतादेखील असतात. आणि जबाबदारीचं म्हणायचं तर ती काही तात्पुरती नसते. आपण लग्न ही जशी आयुष्यभराची गोष्ट म्हणतो तशीच मूल ही किमान त्याच्या पायावर उभे राहीपर्यंतची म्हणजे साधारण पुढच्या २०-२२ वर्षांपर्यंतची जबाबदारी आहे!

ह्याची जाणीव विशेषत: पुरुषपालकांसाठी फार महत्त्वाची आहे. सुरुवातीला खेळवण्यात, लाड करण्यात किंवा शाळेत आणण्या-सोडवण्यापुरता सहभाग पुरुष पालक घेत असतात आणि जसजसा मुलांचा सामाजिक वावर वाढतो, त्यांचे म्हणून नवे प्रश्न पालकांच्या समोर येऊ लागतात तेव्हा काय भूमिका घ्यायची, हे काही बहुतांश पुरुषपालकांना स्पष्ट नसतं. किंबहुना रागावणं आणि मारणं ह्यापलीकडे पुरुषपालकाची भूमिकाही साधारणपणे नसते. याउलट बऱ्याचदा स्त्रीपालकांची पालकत्वाची जाणीव पुरुषपालकांपेक्षा थोडी जास्त प्रगल्भ असते. त्यांना लांबचे प्रश्न थोडेतरी दिसतात, कधी ठाम आणि कधी सौम्य भूमिका घ्याव्यात ह्याची जाणीव त्यांना असते. अपवाद दोन्हीलाही असतात हे खरंय, पण एकंदरीनं मी म्हणतीये तशीच परिस्थिती जास्त दिसते.

**महेश** : ताई, म्हणजे लग्नाच्या कारणांचा आणि ते निभावण्याचा आपण जसा विचार केला तसा मूल होऊ देण्यामागे आणि ते वाढवण्यामागेपण नेमका विचार असायला हवा. पण ही जाणीव तर आपल्याकडे पालकांना नसतेच. लग्नाला एकदोन वर्षं झाली की आता मूल हवं असाच आग्रह घरातले इतरच काय, नातेवाईक, शेजारपाजारचेही करू लागतात. आणि नव्राबायको त्याला बळी पडतात.

**संदेश** : पण ताई, तुम्ही करताय तसा सिरीयसली विचार करत राहिलं तर घाबरून मूल होऊ देणार नाहीत लोक! ... मग मानवजातच नष्ट होईल की !

**निगार** : ए संदेश, गप बरं का! सातशे कोटी लोक राहतात ह्या जगात, मानवजात नष्ट होईल या भीतीनं मूल होऊ द्यायची वेळ तुझ्यावर तरी येणार नाही, कळलं ना?

**ताई** : आपल्याला मूल व्हावं, ही प्रत्येक जीवमात्राला एक आंतरिक ओढही असते. मुद्दा असा आहे की माणूस हा संस्कृती निर्माण करणारा, विचार करणारा हुशार जीव, म्हणून मूल व्हावं या आंतरिक ओढीबरोबर सजगपणे एक बालपण फुलवायची, एक माणूस घडवायची संधी आपण घेत असतो ह्याची जाणीवदेखील हवी.

**प्रियांका** : हो, नाहीतर काय आपल्याकडे एक नाही तर दोन तीन मुलं झाली तरी 'वाढतात ती आपोआप' असं लोक म्हणत राहतात. त्याच्या मागे कसला विचार आणि कसलं काय !

**निगार** : हो नं, एचआयव्हीसह जगणाऱ्या जोडप्यांमध्ये तर लग्न झालं म्हणजे गड जिंकल्याचीच भावना असते, त्यानंतर आईवडिलांचा 'नातवंडाचं तोंड पाहू द्यात' असा आग्रह एका बाजूला चालू असतो, त्या आग्रहाला बळी पडून आपल्याकडे मूल होऊ देण्याचा निर्णय होतो.

**सरिता** : त्याहीपेक्षा अतिशय बेजबाबदारपणे म्हणजे मूल होण्याचा कोणताही निर्णय झालेला नसताना, कंडोम फाटला असं सांगत, आता गर्भ राहिला... म्हणूनही काहींना मुलं होतात.

**प्रियांका**: असा कंडोम फाटत असतो का?

**ताई** : नाही, खरं तर कंडोम सहसा फाटत नाही, पण आधी बोलणं झालं होतं तरी का काळजी घेतली नाहीत, असा प्रश्न डॉक्टर विचारतील या भीतीनं ते एक कारण देतात इतकंच. मूल का हवं ह्याचा विचार करून, ठरवून मूल होऊ देणं ही आजच्या काळातली महत्त्वाची बाब आहे. फक्त कंडोम फाटला आणि ते दिवस नेमके गर्भ राहण्याचे असलेच, तर इमर्जंसी पिल्स घेता येतातच. आणि जोडीदार एचआयव्ही नसलेला असेल तर मगाशी संदेश म्हणाला ती पेपची एआरटी औषधं काही दिवस डॉक्टर देतात ती घेता येतील.

निगार : आणि हो. पालक होण्याचा निर्णय झाला तिथेच सगळं झालं असं नाही मूल ही दोघांची मिळून जबाबदारी आहे. आईवडलांच्या भांडणांचा मुलांवर फार वाईट परिणाम होतो असं मी वाचलंय.

**प्रियांका** : पण मग कसं वागायचं? म्हणजे मुलं झोपली किंवा शाळेत गेली की वाद घालायचे असं का? माझे आईबाबा असंच करायचे, पण म्हणून आम्हाला ते वाद कळलेच नाहीत असं नाही.

**ताई** : (हसून). मुलं नसताना वाद झाले तरी ते तिथेच पूर्ण करावे. म्हणजे उगीच चिडचिड किंवा धुसफुसत राहू नये; मुलांना हे सगळं चांगलंच समजत असतं.

एरवी दोघंच असताना छोटे वाद लांबले तरीही दोघांखेरीज इतर कुणावर त्याचा फारसा परिणाम होणार नसतो. मूल झाल्यावर मात्र जोडीदाराशी बिघडलेला संवाद लगेचच मुलांवर परिणाम साधत असतो. त्यामुळे सुरवातीची एकमेकांशी जुळवून घेण्याची भांडणं संपेपर्यंत मूल होऊच देऊ नये. आईवडलांच्या भांडणात मुलांना खूप असुरक्षित वाटतं आणि थोडी मोठी मुलं तर त्याचा फायदादेखील घेतात किंवा काही वेळा मोठं झाल्यावर कसं वागायचं ह्याचे धडे त्यावरून शिकतात.

**संदेश** : पण ताई, अग, अगदीच पटत नसेल तिथे काय करावं ग? मग मुलाचं तिथे काय होईल ?

**ताई** : संदेश, हा खूप अवघड प्रश्न आहे, म्हणूनच तर जोडीदारांचं एकमेकांशी चांगलं जमत -पटत असेल तरच 'मूल' आयुष्यात येऊ द्यावं. मुलं झाल्यानंतर **वेगळं होण्याच्या परिणामांचा, मुख्यतः मुलांवर**

**होणाऱ्या परिणामांचा एकदा नाही तर हजारदा विचार करावा.** आईवडलांच्या **घटस्फोटाचे मुलांवर अतिशय तीव्र परिणाम होतात.** अर्थात मूल झाल्यावर आईवडलांचं पटेनासं झालं तर वेगळं व्हायचा निर्णय घेण्याची वेळ येऊ शकतेच. अश्या सतत भांडणाऱ्या आईबापांसह जगण्यापेक्षा एका पालकासोबत मुलं अधिक सुखानं जगतात.

मला मूल वाढवताना अजून एक गोष्ट महत्त्वाची दिसते ती म्हणजे मुलांसाठी वेळ देणं. एक तर कामाचे तास, आर्थिक ताण ह्या सगळ्याचा समतोल साधत मूल वाढवणं ही खूपच आव्हानात्मक गोष्ट आहे, आजच्या बदलत्या वातावरणात खूप असुरक्षितता आहे, एकेकटी मुलंच घरात आहेत, भावंडं नाहीत, मुलांना आकर्षक वाटतील अशा पण टाळायला हव्यात अशा अनेक गोष्टी आजूबाजूला आहेत, अशावेळी पालकांनी त्यांना वेळ द्यायला हवाच. आणि तो फक्त आईने नाही तर दोन्ही पालकांनी द्यायला हवा, अगदी पालक एकमेकांपासून वेगळे झालेले असले तरीही.

**मुलांना वेळ देण्यात मुलांना फायदा तर होतोच,** शिवाय पालकांचं आणि मुलांचं **त्याचं नातं अधिक घट्ट होतं.**

**ईशान** : ताई, फार मस्त वाटलं तुमच्याशी बोलून. तुम्ही सगळेच खूप छान चर्चा करता. निगारनं मला सांगितलं होतं तुमच्याबद्दल. मी एचआयव्ही निगेटिव्ह आहे. आणि माझी ही जोडीदार पॉझिटिव्ह आहे, तर आमचं मूल निगेटिव्ह व्हायला हवं तसं ते होईल का याची मला काळजी वाटायची. तुमच्या सगळ्यांच्या बोलण्यातून ती काळजी तर गेलीच पण मुळात लग्न, मूल होणं या महत्त्वाच्या निर्णयांआधी काय पाहायला लागतं तेही कळलं.

**सरिता** : आणि मला तर आता असं वाटतंय की बरं झालं मला एचआयव्ही आहे ते. नाहीतर ह्या चर्चेत मी सामील झालेच नसते ना, कधी कळलंच नसतं मला हा विचार करायला हवाय हे. कुणी सांगितलंही नसतं.

## प्रकरण 6: एचआयव्हीसह लग्न करताना पालकांची भूमिका -

लग्नाचा विषय म्हटला की पालकांची भूमिका मुलांसाठी खूप महत्त्वाची असते. लग्नेच्छुक मुला-मुलींच्या पालकांशी काही चर्चा व्हावी असं ह्या जमलेल्या मित्रमैत्रिणींचं म्हणणं होतं. काही पालकही चर्चेसाठी यायला तयार होते.

**सरिता** : ताई, माझी आई आणि पप्पा आलेत गं माझ्याबरोबर (सरिताने आईची आणि वडिलांची ओळख करून दिली )

**प्रियांका**: ताई, माझे पण मम्मी आणि पप्पा दोघंही आलेत.

**महेश** : माझीपण आई आलीये गं ताई.

**निगार** : ताई, माझ्याबरोबर माझी मोठी बहीण आलीय. वडिलांना जमत नाही म्हणून ती आली आहे.

**संदेश** : ताई, माझ्याबरोबर आज कोणी नाही आलेलं. पण हे सगळे माझेही पालक आहेत, काय काका, आहात ना?

**ताई** : संदेश, तुम्ही आता मोठी मुलं आहात, या वयापर्यंत आल्यावर आपण स्वत:ही आपले पालक असतोच की. आपल्या आईवडिलांसारखं आपणही स्वत:ला वाढवलेलं असतं, समजावलेलं असतं. त्यामुळे हे सगळे तर तुझे पालक आहेतच, तू स्वत:चा पालकही आहेस. तर करूया सुरवात?

सुरवात करण्यासाठी म्हणूनच मी सर्वांना एक प्रश्न विचारते. तुमच्या मुलानं किंवा मुलीनं म्हणजेच पाल्यानं असं म्हणू. आपापलं लग्न ठरवावं असं तुम्हाला वाटतं, की तुम्ही ठरवलेल्या स्थळाशी लग्न करावं असं वाटतं?

**प्रियांकाचे पप्पा**: हे बघा ताई, आमच्या घरातलं सांगतो. प्रियांकानं कुणाशी लग्न ठरवावं याबद्दल एरवी आमचं काही म्हणणं नसतं, पण इथं जरा वेगळं आहे. पियुचं लग्न हाच एक प्रश्न आहे. कसं होणार या लेकराचं लग्न? एचआयव्ही आहे म्हणून सांगितल्यावर प्रेमाचं असो नाहीतर ठरवायचं असो, कोण करणार लग्न? म्हणजे ज्याला एचआयव्ही आहे असाच मुलगा आपल्याला हवा. मग आता त्यातल्या त्यात नातेवाईकांनी ज्यादा प्रश्न विचारायला नको म्हणून जमलं तर जातीचा बघायचा.

**सरिताची आई** : एचआयव्ही आपल्याला असला आणि पोरीला झाला की सगळाच प्रश्न हो! आपल्या एचआयव्हीचं त्या पोराला म्हणजे तिच्या नवऱ्याला कळणारच की. त्याचं टेंशन येतं. औषधं घेतली की, आता एचआयव्हीचं तसं काही राहिलेलं नाही. सरिता लहान असताना एक वेळ तर अशी होती की आम्ही तिघंही आजारी होतो. सरिताचे वडील आणि सरिताला ॲडमिट केलं होतं आणि मी घरी निजून होती.

आमच्या सासू-सासऱ्यानी सगळं आजारपण काढलं. तिथून आम्ही औषध घ्यायला लागलोत. आता सगळे रोजच्या रोज घेतो. अशी वेळ परत आली नाही पण लेकराला तरी आपल्यासारख ह्या सगळ्यातून कशाला जावं लागावं ...

सरिता :ए आई ग सारखं मागचं उगाळत का बसतीस ! आता परत तसं झालाय का आणि नको काळजी करत बसू गं आता औषधांनी किती मस्त राहतोय आपण तिघं पण !

**महेश**:आमच्या गटातल्या काहींची लग्नंही झाली आहेत बरं का आणि त्यांना निगेटिव्ह मुलंदेखील झालेली आहेत. तेंव्हा काका आणि काकी आमच्या काळजीत नका इतका विचार करत बसू.

प्रियांका: आणि पुढे जाऊन सगळ नीट घडायला  अट फक्त एकच. औषध घ्यायला पाहिजे; सहा महिन्याला-वर्षाला सीडी4 च्या आणि वायरल लोडच्या तपासण्या करायला पाहिजेत.

**निगार** : अजून एक, एचआयव्हीबाबत एकमेकांना क्लीयरली सांगायला पायजे.

**प्रियांकाचे पप्पा** : सांगायला पाहिजे ते झालं, पण सांगितल्यावर लग्न कोण करील?

**ताई** : काय हरकत आहे लग्न करायला? कोणी एक निगेटिव्ह असेल तरीही लग्न, मूल, आनंदी सहजीवन सगळं शक्य आहे.

**प्रियांकाची मम्मी** : पण निगेटिव्ह का करतील आपल्या मुलांशी लग्न ?

**ताई :** करायला हरकत काहीच नाही. विचार जुळत असतील, एकमेकांवर प्रेम असेल आणि एचआयव्हीबाबतच्या सगळ्या प्रश्नांचं, शंकांचं निरसन स्पष्टपणे झालेलं असेल तर त्यात काहीच अशक्य नाही.

**प्रियांकाची मम्मी**: ताई, अहो, असं काय करता? आता सरिताचं लग्न समजा निगेटिव्ह मुलाशी झालं तर त्याला एचआयव्ही होईल ना! दुसऱ्याच्या लेकराला आपण धोक्यात का टाकावं? समजा, लग्न होताना त्याला कळलं नाही तरी कधी ना कधी कळणारच. आमच्या घरी देवीचं स्थान आहे. आम्ही असं वागलो तर देवी आम्हाला जाग्यावर ठेवील का?

**निगार** : काकू, ऐका ना, सरिता औषधं नियमित घेते ना, तिचा व्हायरल लोड एल्डीएल आहे ना, मग तिच्या नवऱ्याला तिच्यामुळे एचआयव्ही होणार नाही. हा विषय वेगळा आहे, आणि एचआयव्ही बद्दल सांगण्याचा विषय वेगळा. त्याला धोका फारसा नसला तरीही सांगायला  पाहिजेच.

**प्रियांकाची मम्मी :** त्याला जर धोकाच नसला तर मग कशाला सांगता?

**निगार** : काकू, अहो, लग्न करतेय ना सरिता त्याच्याशी, आयुष्यभर पुरावं अशा इच्छेनं नातं जोडतेय ना, मग त्याची फसवणूक का करावी आपण, शिवाय नियमितपणे औषधं आणणं, घेणं, तपासण्या करणं हे तर नेहमीचं पण अनेक ठिकाणी एकमेकांची काळजी घेण्याची गरज पडतेच की नवराबायकोंना. त्यांना एकमेकांबद्दल शक्य तेवढं माहीत हवंच की.

**प्रियांकाची मम्मी** : ते आहे म्हणा, आणि जसं नेहमी डॉक्टरांकडच्या ताई आपल्याला सांगत असतात की प्रत्येक संबंधांच्या वेळी निरोध वापरा त्याच इथं काय करायचं ? म्हणजे औषधं घेतल्यामुळे व्हायरल लोड कमीचा झाला तर मग निरोध वापरायला हवा की नको?

**ताई** : व्हायरल लोड शून्य असला की धोकाही जवळजवळ नाहीच आहे, पण तरी आणखी काळजी म्हणून प्रत्येक लैंगिक संबंधांच्यावेळी निरोध वापरावा असंच आम्ही सुचवतो.
मूल हवं असेल तेव्हा औषधांच्या मदतीनं डॉक्टर सांगतील तसं काळजी घेऊन आपल्याला योजना करता येते. ते सगळं या मुलामुलींशी अगदी संगतवार बोलणं झालेलं आहे.

**प्रियांका** : अजून लग्न तर होऊ दे, बाळाचं पुढे बघू.

**सरिताची आई** : तसं नाही. अग ताई, तो विचार पण करायलाच हवा, ( प्रियांकाच्या मम्मीकडे बघत) नाही का हो? आमच्याकडून मुलीला झालाच नं! किती रडले मी... अजून आठवतं मला. तसं नको ग, आता सरिच्या बाळाला अजिबात व्हायला नकोय ...

**सरिता** : अग आई, ऐक की निगार काय म्हणतीय. तेव्हा औषधं नव्हती, आता ती आहेत, त्यामुळे मुळातच आईच्या शरीरातील विषाणू जवळपास नाहीसा होतो, मग मुलांपर्यंत पोहोचणारच नाही ना!

**सरिताचे पप्पा** : आता असा निगेटिव्ह मुलगा कुठं मिळणार ते सांगा म्हणजे काम भागलं.

**प्रियांकाचे पप्पा** : ताई, जातीतलाच मुलगा मिळतो का हो, म्हणजे पॉझिटिव्ह असेल किंवा नसेल तरीपण प्रियांकाची लागण समजून घेईल आणि जातीतच लग्न होईल?

**ताई** : जातीतल्याच नवरानवरीची गरज का वाटते तुम्हाला? मुळात जातीवर, ओळखीवर किंवा पत्रिका वगैरे पाहून आपल्या समाजात लग्न का ठरवतात? लग्न ही एक कायमस्वरूपी गोष्ट आपण मानतो, हो ना? एखाद्या माणसाशी बोलून, त्यांचा सहवास अनुभवून लग्नाचा निर्णय घ्यावा, अशी पद्धत आपल्याकडे अजून पुरेशी आलेली नाही. पालक म्हणून, मुलामुलींना तशी संधी आपल्याकडे सामान्यपणे कुणी देईल असं मला वाटत नाही. पण ह्याला उत्तर म्हणून आपण कुठल्यातरी, ज्याच्याविषयी आपल्याला काहीही अंदाज नाही अशा मुलीशी किंवा मुलाशी आपल्या लेकराचं आयुष्य बांधून देतो.

**प्रियांकाचे पप्पा**: अहो, पत्रिका पाहाण्यामागे शास्त्र आहे ताई, पुढे एकमेकांशी जुळेल की नाही हे त्यावरूनच समजतं!

**महेश** : याबद्दलचे बरेच अभ्यास झालेत काका, आपल्या अंधश्रद्धा निर्मूलन समितीनंही केले होते. त्यातून 'पत्रिकेतून काहीही समजत नाही' असंच दिसलं. आपल्यालाही दिसतं ना, कितीतरी लग्नं अगदी ३६ गुण जुळूनही टिकत नाहीत किंवा पत्रिका न पाहूनही टिकतात की काका.

**निगार** : आणि पाश्चात्य देशात तर हा प्रकारच नसतो, तरीही त्यांची लग्नंही टिकतात की.

**ताई** : पत्रिकेवर विश्वास ठेवावा ही आपल्या मनाला लागलेली निराधार सवय आहे. एखाद्या स्थळाला होकार किंवा नकार देण्याचा चांगला निकष आपल्याजवळ नसल्यामुळे आपण पत्रिकेतल्या दोषांवर किंवा गुणांवर अवलंबून राहून लग्न ठरवतो. एकेकाळी विज्ञानाची जाणीव नव्हती, चुकीच्या समजुती लोकांच्या मनात होत्या, त्यावेळी सामान्य आडाख्यांमधून कुणीतरी सुरू केलेल्या पत्रिका वगैरेंवरच्या ज्योतिषशास्त्रावर लोक विश्वास टाकत. पण आजच्या काळात पत्रिकेतल्या गुणांपेक्षा मुलांचं आरोग्य आणि विचार, मनं एकमेकांशी जुळणं आपल्याला जास्त महत्त्वाचं वाटतं. तेव्हा पत्रिकेचा आग्रह न धरता मुलामुलींच्या आवडीचा आणि त्यांच्या जोडीदार निवडीच्या हक्काचा आग्रह धरावा हेच जास्त योग्य दिसतं.

**प्रियांकाची मम्मी** : पण आमचा अनुभवही आहेच ना, म्हणजे आम्ही नाही का केला संसार, आई-वडिलांनी ठरवलेल्या व्यक्तीशी! तेव्हा कुठे काही चर्चा आणि 'आमचं आम्ही ठरवू' अशी काही पद्धत होती? आणि आमचं कुठे काय अडलं?

**ताई** : तुम्ही म्हणताय ते बरोबर आहे प्रियांकाची आई, परंतु बदलत्या सामाजिक परिस्थितीत, मुलाचं बदलतं विश्व- त्यांची मोकळीक हे सगळं पाहता जबरदस्तीनं जोडलेलं नातं आनंदाचं कसं होणार? आणि आनंदाचं नसेल तर भांडणं होणार, नातं मोडणार टिकणार नाही. त्यापेक्षा ज्यामध्ये त्या दोघांना आनंद आहे तेच नातं आपण मानलं तर ... आपल्याला तरी काय हवं असतं हो, आपल्या लेकराचा आनंद, हो ना? मग लग्न ज्यांचं, त्यांचा निर्णय हीच दृष्टी ठेवायला हवी. मी एक विचारते, समजा जातीतला पत्रिका जुळलेला मुलगा तुम्ही प्रियांकासाठी आणलात, त्याला एचआयव्ही नाही, किंवा निदान प्रियांकाप्रमाणे आधीपासून माहीत तरी नाही. तर तो प्रियांकाला स्वीकारेल का? खरं म्हणजे काहीही हरकत नाही, पण समाजाच्या मनातल्या अज्ञानामुळे तो स्वीकारण्याची शक्यता कमी आहे. म्हणूनच तुम्ही त्याला प्रियाला एचआयव्ही आहे 'हे सांगूच नका' असा विचार करताय. पण कधी ना कधी त्याला कळणार नाही का? त्याला कळल्यावर त्यानं प्रियांकानी फसवलं असं म्हटलं तर? जन्मभर स्वत:ला दोष तेवढा देत बसू आपण.

**प्रियांकाचे पप्पा** : म्हणजे आम्ही पूर्ण निवृत्ती घ्यावी की काय ? आणि मुलांना वाऱ्यावर सोडायचं का?

**ताई** : निवृत्ती घ्यावी पण पूर्ण निवृत्ती नाही, फक्त मुलांच्या वतीनं निर्णय घेण्यात आता निवृत्ती घ्यावी. कामामधून नाही का आपण घेत? लहानपणी कुठल्या शाळेत घालायचं, काय खायला द्यायचं, कुठे जायचं हे सगळे निर्णय आपणच घ्यायचो ना, मुलांच्या वतीनं? पण आता मुलं मोठी झालीत, आता त्यांना त्यांचं त्यांचं आयुष्य आहे. आता आपण निवृत्तीच घ्यावी त्याबाबतीत. फार तर आपली मतं, आपले अनुभव सांगावेत, पण त्याचप्रमाणे सगळं घडेल अशी अपेक्षा गृहीत धरू नये. मुख्य म्हणजे त्याविषयी कोणताही अपमान मानून रागराग करत बसू नये. उलट मुलांनी मुलींनी आपापले निर्णय विचार करून घ्यावेत याला आपण महत्त्व द्यावं ही पालक म्हणून जबाबदारी वाटते मला आणि मुलांनीही पालकांशी विचारविनिमय करून, पण निर्णय मात्र त्यांना नम्रतेनं बाजूला ठेवून स्वतःच्या जबाबदारीवर घेणं घ्यायला हवा. आपण घेतलेला निर्णय निभावण्याचीही जबाबदारी मुलामुलींचीच आहे.

**निगारची ताई** : मुलामुलींनाही अनेकदा लग्नाचा निर्णय स्वतः घेण्याची धास्ती वाटते, कारण एकतर तो फार मोठा निर्णय असतो. असे निर्णय स्वतः घेण्याची सवय नसते आणि नेहमी आईवडिलांनीच निर्णय घेऊन देण्याची सवय असल्यानं '**आईवडील काय योग्यच करणार की!**' असं त्यांना वाटत असतं. नंतर काही वादाची परिस्थिती उद्भवली तर 'तुम्हीच लग्न लावून दिलंत आता तुम्हीच दुरुस्त करा' म्हणायलाही जागा उरते त्या मुलांना, पण हे काही बरोबर नाही.

**आई-वडिलांची मदत आणि त्यांच्याशी संवाद बऱ्याचदा मदतीचा ठरतो, पण त्यांच्या सल्ल्यामध्ये दबाव असू नये म्हणजे त्या सल्ल्याची खरी मदत होईल.**

**संदेश** : ताई, काही मुलं तर पालकांची परवानगी मिळेस्तोवर लग्नासाठी थांबू असाही निर्णय घेतात. त्यांना पालकांचा सहभाग आनंदानं असावा असं वाटत असतं, तर काही मुलं स्वतः ठरवलेल्या विवाहाला परवानगी मिळत नाही म्हणून आपल्या आवडीला मुरड घालतात.

**निगारची ताई** : पण दोन्हीकडे परिणाम वाईटच होणार. कोणीच आनंदी होत नाही अशानं!

**सरिताची आई** : कधी कधी लग्नानंतर मुलं सुधारतात, म्हणून... म्हणजे चांगल्या हेतूनंच...

**ताई** : पण चांगल्या हेतूचा परिणाम चांगलाच होईल असं नाही. आपला निर्णय चुकला तर काही झालं तरी त्याची जबाबदारी मुलांचीच राहते. मुलांनी घेतलेला निर्णय बरोबरच असेल असंही काही नाही, पण तरीही तो निर्णय आपण स्वत: घेतलेला आहे, याची जाणीव मुलांमध्ये राहू दे.

आणि लग्नानंतर मुलं सुधारतात ह्यात काय तथ्य आहे? मुळात लग्न हा एखादी परिस्थिती सुधारावी म्हणून, आजारावर उपचार म्हणून करायची गोष्टच नाही. अगदी स्वतःच्या अनुभवानंही आपण हे सांगू शकतोच. एक उदाहरण म्हणून सांगते, वयानं वाढलेला, परिस्थिती बरी असणाऱ्या घरातला काहीसा गतिमंद मुलगा 'लग्नानंतर सुधारेल' असं म्हणत, लग्न लावण्याची घाई त्याच्या आई-वडिलांनी केली,

नवऱ्या मुलीला ह्या कोणत्याच बाबतीत काहीच माहिती दिली गेली नाही, लग्नाच्या पहिल्या रात्रीच तिला हा सगळा प्रक्रार लक्षात आला.

**प्रियांकाचे पप्पा** : हे तुमचं मला पटलंय ताई, अहो, आपल्या पोरीला कोणी फसवावं आणि त्यांच्या पोराच्या सुधारण्यासाठी तिला करून न्यावी असं कुणीच वागू नये.

**सरिताची आई** : अहो ताई, लग्नाचा उपयोग उपचारासाठी लोक करतात. एचआयव्ही असलेल्या मुलग्यानी लहान मुलीशी संबंध केला तर एचआयव्ही बरा होऊन जातो असाही समज आहे लोकांचा. म्हणून मुलांचं लग्न लावून देणारे पालकही असतात !

**प्रियांकाची मम्मी** : पण ही पोरं पण काही वेळा कशीतरी वागतात. 'आम्हाला हवं तसं वागा नाहीतर औषधाची गोळी बंद करतो' अशा धमक्या देतात, निगेटिव्ह जोडीदाराचा हट्ट धरतात, मग आम्ही ह्यांचं निर्णयस्वातंत्र्य, त्यांचं आयुष्य हे सगळं त्यांच्यावर सोडायचा निर्णय कसा करायचा?

**ताई** : पहिली गोष्ट अशी की मुलांना तुम्ही जसं मनाविरुद्ध वागायला लावायचं नाही, तसं त्यांनीही करायचं नाही. मुलांच्या वागण्याला जरा धीरानं घ्या, गोळ्या न घेण्याच्या धमक्यांना घाबरून जाऊ नका, डॉक्टरांची आणि समुपदेशकाची मदत घ्या. तुमची मते हवीच तर शांतपणे बोलून पाहा, पण तसंच घडलं पाहिजे असा हट्टदेखील धरू नका.

आणि मुलांनीपण काही गोष्टी लक्षात घ्याव्यात ...

स्वतःची भूमिका तपासून पाहावी. सर्वात महत्त्वाचं म्हणजे औषधं न घेण्यासारखं बेजबाबदार वागणं कधीही करूच नये. हे म्हणजे स्वत:ची हिंसा करण्यासारखं आहे, आणि हिंसा कुठलीही-- स्वत:ची किंवा दुसऱ्याची, ती वाईटच.

**निगार** : गोळ्या न घेणं म्हणजे एकप्रकारचं सुसाईड करणंच आहे !

**कोणत्याच पालकांचा उद्देश वाईट असत नाही, परंतु लग्नामध्ये दोन बाजू असतात आणि तो त्या दोन संपूर्ण आयुष्यांचा प्रश्न असतो. तेव्हा आपला उद्देश दुसऱ्या बाजूसाठी किंवा स्वतःच्या पाल्यासाठी अन्यायकारक ठरत नाही ना हे बघणंच श्रेयस्कर!**

**निगारची ताई** : काही पालकही म्हणतात की आपण मुलासाठी एचआयव्ही नसलेलीच आणि गरीब मुलगी शोधू किंवा मुलीला एचआयव्ही आहे म्हणून वयानं बराच मोठा मुलगा असला तरी लग्न उरकून टाकण्याची काही पालकांना घाई असते. काही वेळा आई-वडील नाहीत, अशा मुलांचे पालक मिळेल त्या मुलाशी लग्न उरकायला बघतात. पालकांच्या अशा घाईमुळे निर्णय चुकायची शक्यता जास्तच आहे.

**ताई** : हो, मगाशी बोललो ना आपण. काही पालक असं करायला मुलांना भाग पाडतात, त्यानंतर त्या लग्नातलं विश्वासाचं नातं सुरुवातीपासूनच अविश्वासाचं होतं, हे त्यांना कळतच नाही. बरेचदा स्वतःच्या डोक्यावरचं ओझं उतरवायचं हेच त्यांना महत्त्वाचं वाटत असतं.

**सरिताची आई** : लग्नानंतरपण काही पालक मुलांच्या संसारात सारखे ढवळाढवळ करत राहातात. मला वाटतं त्यांनी तसं करूच नाही. म्हणजे आपल्या लेकराला विशेषत: मुलीला आपला आधार असावाच. काही प्रश्न आला तर आधाराला आपण आहोत याची खात्री असावीच, पण तिची सासरच्या लोकांबद्दलची मतं तिची तिचीच असावीत. त्या तसल्याच आहेत, ह्या असल्याच आहेत, असं आपण म्हणू नये.

**प्रियांकाचे पप्पा :** अहो ताई, आमच्या काळात आमचं आईवडिलांशिवाय पान हलायचं नाही, तशी परिस्थिती आता नाही, उलट मुलं जबाबदारीनं वागली तर बरंच आहे. पियु इतकी लाडकी आहे ना आमची, की मला ऑफीसमध्येही ही पोरगी जेवली का, नीट आहे का, तिला काय त्रास नाही नं... असं वाटत असतं. मग फोन करतो मी घरी. आता हिचं लग्न झाल्यावर अशाच काळजीपोटी तिच्या संसारात डोकावत राहणं चुकीचं होईल. त्या नवऱ्याला काय वाटेल, का बाबा हा माणूस तर आपल्यावर अविश्वासच करतोय. आपण आपलं प्रेमापोटी सगळं करत राहणार आणि त्याचा परिणाम भलताच व्हायचा!

**ताई** : मुलीचे वडील म्हणून खूप चांगला विचार सांगितलात तुम्ही प्रियांकाचे पप्पा!

**निगार** : ताई, ह्याला जोडूनच अजून एक म्हणजे काही केसेसमध्ये लागणीबाबत आधीपासून माहीत असूनही, नातवंड स्वतःजवळ ठेवून, सुनेला घराबाहेर काढणं, इस्टेटीचा वाटा न देणं, तसेच एका जोडीदाराला एचआयव्हीची लागण असेल, तर लागण नसलेल्या जोडीदाराचं परस्पर लग्न लावणं असे अनेक प्रकार मुलां-मुलींचे आईवडील करतात.

**सरिता** : आपल्या ऋचाच्या बाबतीत असंच नाही का झालं? तिने लव्ह मॅरेज केलं शुभमशी, पण त्यानं घरात हिच्याबद्दल आधी काही सांगितलं नाही, सुरुवातीला आनंदानं राहिले ते दोघं. पण नंतर , शुभमच्या आईवडिलांच्या सांगण्यावरून त्यानं चक्क दुसरं लग्न केलं. अग, आता तो अधेमधे हिच्याकडेही राहायला येतो आणि आईवडिलांबरोबरपण राहतो. यात चूक कोणाची?

म**हेश :** ताई, अजून एक गोष्ट बोललो तर कदाचित तुम्हा सगळ्यांना आवडणार नाही पण इतकं खोल आपण बोलतच आहोत तर **...**

**ताई :** बोल नं महेश, सगळ्या मुद्द्यांवर नीट बोलावं म्हणूनच तर आपण भेटतो,
**महेश**: ताई, आपली एकूणच सामाजिक आणि कौटुंबिक परिस्थिती ही एकमेकांवर अवलंबून राहण्याची आणि व्यक्तिवादी स्वातंत्र्य नसण्याची आहे. त्याचमुळे सर्वसाधारणपणे मुला- मुलींचं लग्न होईपर्यंत

त्यांची पूर्ण जबाबदारी पालक घेत राहतात, अगदी त्यांची मुलं सांभाळण्याचं कामही करत राहतात किंवा ते त्यांचं कर्तव्य म्हणूनच मानलेलं असतं. त्यानंतर मात्र मुलगा आणि सुनेनं पालकांची सगळी जबाबदारी घ्यायची असते.

**निगार** : त्याचसाठी तर आपल्या कुटुंबांना मुलगा हवा असतो,

**महेश** : हो, तू म्हणतेस ते खरं आहे, बऱ्याच ठिकाणी 'आम्ही नाही का तुमचं केलं, आता आम्हाला बघणं हे तुमचं कर्तव्यच आहे' हे परतफेडीचं वाक्य सहजपणे बोललं जातं.

**प्रियांकाची आई** : मुला-नातवंडांना आनंदी पाहणं हीदेखील खूप मोठी परतफेड असते.

**सरिताची आई** :, खरंय, मुलांनी म्हातारपणी आपलं बघावं, ह्या अपेक्षेनंच आपल्याला मुलगा हवा, कर्ती सून हवी असते, मुलांनीही संभाळावं मोठ्यांना पण सून म्हणजे मोलकरीण समजून तिच्यावर सगळी कामाची जबाबदारी टाकून नाही. त्यापेक्षा आपलं स्वातंत्र्य आपण ठेवावं मुलांना आपलं ठेवून द्यावं.

**प्रियांकाचे पप्पा** : सगळ्याच पालकांना हे सगळं कदाचित पटणार नाही, परंतु असा विचार करण्याची वेळ आता खूपच जवळ येऊन ठेपली आहे. घरातलं सततचं वादाचं वातावरण, त्यामुळे येणारा ताण, वाढत चालेला विसंवाद हे जवळपास सर्व घरातून दिसतंय. म्हणूनच पालकांच्याही स्वातंत्र्याच्या विचाराला आता आपल्या मनात स्थान द्यावं लागणार आहे.

**सरिताचे पप्पा** : पोरापोरींना चांगल्या- वाईटाची जाणीव करून द्यावी, फार तर सल्ले द्यावेत, पण निर्णय त्यांचा स्वतःचा असावा हे बरोबरय. त्यांनी त्यांची जबाबदारी घ्यायला लग्नाच्या निमित्तानं सुरुवात केली यात आपल्याला आनंदच आहे.

0000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000000